न. ग्रं. सं. ठाणे
विषय — चरित्र
सं. नं. २८

# न्सिलांतली कामगिरी.

फेब्रुवारी १९२४ ते फेब्रुवारी १९२५

## भाग पहिला



REFBK-0002723

### नारायणराव रामजी गुंजाळ

# माझी कौन्सिलांतली कामगिरी.

फेब्रुआरी १९२४ ते फेब्रुआरी १९२५

## भाग पहिला

श. क्र. 2723

REFBK-0002723

नारायण रामजी गुंजाळ

मुद्रक
रा. गणेश काशिनाथ गोखले, सेक्रेटरी श्री गणेश प्रिंटिंग वर्क्स,
४९५-९६ शनवार, पुणें शहर.

प्रकाशक
रा. नारायणराव रामजी गुंजाळ, १८६ कसबा पेठ पुणें शहर.

# प्रस्तावना.

मुंबई कौन्सिलच्या गेल्या निवडणुकींत पुणें जिल्ह्यातर्फे मी एक उमेदवार उभा राहिलों व आपण प्रचंड बहुमतानें मला कौन्सिलांत निवडून दिलें. त्याप्रमाणें कौन्सिलांत मला काय काम करतां आलें याची माहिती आपणांस देणें माझें कर्तव्य असल्याप्रमाणें कौन्सिलांतील माझ्या कामगिरीची हकीकत प्रसिद्ध करण्याचा माझा विचार आहे. त्यापैकीं हा पहिला भाग प्रसिद्ध केला आहे. यांत फेब्रुवारी १९२४ जुलई १९२४ आक्टोबर १९२४ व फेब्रुवारी १९२५ या चार कौन्सिलच्या बैठकींत मी केलेल्या कामाची व फेब्रुवारी १९२६मधील बजेट वादाविवादाच्या वेळच्या माझ्या भाषणाची हकीकत दिली आहे. बाकीची हकीकत दुसरे भागांत देण्याचा विचार आहे.

२ कौन्सिलांत लोकांच्या गाऱ्हाण्यांची दाद लावणें हें माझें काम आहें तें मी करीत आहें परंतु तें करतांना ज्या अडचणी येतात व लोकांकडून जी माहिती असावी लागते ती लोकांना कळवीत आहें.कौन्सिलांत प्रश्न रूपानें माहिती विचारून गाऱ्हाण्यांची दाद मागतां येते परंतु जनतेकडून आमचेकडे कौन्सिलांत विचारण्याकरतां जीं गाऱ्हाणीं पाठविलीं जातात त्यांच्यामध्यें पुढील सुधारणा असावी.

१ माहिती खासगी स्वरूपाची मागविली जाते ती सार्वजनिक स्वरूपाची असावी.

२ कौन्सिलची बैठक सुरू कधीं होते हें आधीं वर्तमानपत्रांतून जाहीर होतें अगर मजकडे विचारलें असतां मी ही माहिती देत जाईन. साधारणतः कौन्सिल फेब्रुवारी-मार्च, जुलै—आगष्ट व आक्टोबर नोव्हेंबर महिन्यांत भरतें. कौन्सिलच्या तारखेपूर्वीं प्रश्न निदान दहा दिवस कौन्सिलांत पोंचावे लागतात. त्या बेतानें प्रश्न तयार करून कौन्सिलांत पाठविण्यास योग्य वेळ मिळावा म्हणून प्रश्न त्याच्या आधीं कांहीं दिवस पाठवावे. नाहींतर पुढील. बैठकीपर्यंत ते पडून रहातात व लोकांस असें वाटतें कीं आमचे प्रश्न विचारले जात नाहींत. व मग विनाकारण पत्रव्यवहार चालतो.

३ परराष्ट्राशीं इंग्रज सरकारच्या असणाऱ्या संबंधाचे बाबतींत, संस्थानांचे बाबतींत कोर्टांत खटले चालू असतांना त्या कामाबद्दल, व्यक्तिविषयक, सैन्याबद्दल व आरमाराबद्दल वगैरे बाबतींत प्रश्न विचारतां येत नाहींत. खेरीज अध्यक्षास वाटल्यास त्यांस कांहीं प्रश्नास हरकत घेतां येते. प्रश्नांत कांहीं हकीकती सांगीतल्या असतील तर त्यांजबद्दलची जबाबदारी आमचेवर असते तेव्हां प्रश्नाचे खरे खोटेपणाबद्दल आमची खात्री झाल्याखेरीज ते विचारतां येत नाहींत. प्रश्न विचारण्याच्या बाबतींत कौन्सिलचे नियम आहेत त्या नियमाप्रमाणेंच प्रश्न विचारावे लागतात.

४ इतकेंही करून प्रश्न विचारले तरी बरेच वेळां 'माहिती मागविली आहे' 'विचार चालू आहे' 'सरकारास माहिती नाहीं.' "माहिती देतां येत नाहीं." "माहिती मिळविण्यास फार श्रम पडतील सबब माहिती मिळत नाहीं." अशीं उत्तरें मिळतात व कित्येक वेळां समर्पक उत्तरें मिळत नाहींत या कारणानें वारंवार प्रश्न विचारावे लागतात त्या कारणानें फार काळ जातो. इतके झाल्यावर उत्तरें मिळतात तीं शक्य तितके लवकर आम्ही प्रश्न विचारणाराकडे कळवितों. हल्लीं पुस्तकरूपानें तीं प्रसिद्ध होत आहेत तेव्हां सर्वांनाच तीं कळतील. बैठक संपली कीं ज्या प्रश्नाचीं उत्तरें मिळालीं नसतील ते प्रश्न गळतात त्यांची पुन्हां नोटिस द्यावी लागते.

प्रश्न व त्यांचीं उत्तरें कौन्सिलच्या बैठकीच्या बैठकीचे दिवशीं तयार होतील तसतशीं छापून कौन्सिलांत सुमारें एक तासभर वाचलीं जातात व त्यावर पुरवणी प्रश्नही विचारूं देतात.त्याप्रमाणें आम्ही कित्येक वेळ पुरवणी प्रश्न विचारले आहेत व आमचे प्रश्नावर इतर मेंबर मंडळींनीं ही पुरवणी प्रश्न विचारले आहेत. कांहीं प्रश्नांचीं उत्तरें पुरवणींत दिलीं जातात व कांहींचीं उत्तरें कौन्सिल ऑफिसांतच पहाण्यास ठेवतात. अशांची सविस्तर माहिती या पुस्तकांत येणें गैरसोईचें आहे.

अंदाजपत्रकावर वादविवाद चालतो व अखेरचे जमाखर्चावर कौन्सिल कमिटीची देखरेख असते.

५ कौन्सिलांत दाद लावून घेण्याचा दुसरा मार्ग म्हणजे ठराव आणणें.

ठराव आणण्याची पद्धति पुढील प्रमाणें आहे.

१ ठराव कौन्सिल सुरवातीच्या आधीं पंधरा दिवस कौन्सिलांत पोंचावे लागतात.

२ ठराव आणण्यास गव्हर्नरसाहेबास हरकत घेण्याचा अधिकार आहे.

३ परराष्ट्राशीं व संस्थानाशीं असलेले हितसंबंधांत ठराव आणतां येत नाहीं.

४ कोर्टांत काम चालू असलेल्या बाबतींत ठराव आणतां येत नाहीं.

५ ठराव आणण्याचे कामीं चिठ्या टाकून ज्यांचे नंबर सरासरी दहाच्या आंत येतात त्यांसच ठराव कौन्सिलांत वादविवादास मांडण्याची बहुधा संधि मिळते.

६ एका बैठकींत ठराव आणतां न आले तर पुन्हां लिहून पाठवावे लागतात.

७ बहुधां एका बैठकींत एकच ठराव मांडतां येतो.

अनेक अडचणीमुळें आमचे ठराव कौन्सिलांत वादविवादास आले नाहींत तरी ठराव कोणते मांडले यांची यादी या पुस्तकांत शेवटीं दिली आहे. त्यावरून कळेलच कीं, कुळकर्णी वतने परत देणें, पाटलास योग्य मुशाहिरा देणें, आठ रुपयांच्या आंतील सारा देणारास साऱ्याची सूट देणें, कायम धारापद्धति सुरू करणें, रजिस्टर खात्यांतील फोटोपद्धति बंद करणें, मूळ रहिवाशांची स्थिति सुधारणे. पाण्याचा आकार मर्यादित करणें. दारू दुकानांची बंदी. तळीं व दुसरे वर्गाचीं पाठबंधाऱ्याचीं कामें यांची दुरुस्ती. गोहत्या बंदी. वाढलेला धारावसुल. अमलांत आणूं नये. कौन्सिलास जबाबदार अधिकाऱ्याकडून परभारे माहिती मिळणें. कमिशनर वगैरेच्या जागा कमी करणें. ग्रामपंचायत कायद्यांत फेरफार. वेठबिगर वगैरे.

६ कौन्सिलचें काम फेब्रुवारी महिन्यांत बहुधा मुंबई टाऊन हालांत व जुलई व आक्टोबर महिन्यांत पुण्यास कौन्सिलहालांत चालतें. कोणास

काम पहाणें झाल्यास त्यास तिकीट घेऊन आंत येतां येतें. आलेले लोकांस कौन्सिल पहाण्याच्या कामीं शक्य ती मदत मी केली आहे.

साठे—परांजपे स्कीमप्रमाणें प्राथमिक शिक्षकाचे पगार वाढवावे याविषयीं मी अनुकूल मत दिलें आहे. व या कामीं कौन्सिलमधील सर्व पक्षाचे बहुमत व्हावें म्हणून अंशतः खटपट केली आहे.

कौन्सिलच्या कोणत्याही सभासदास मताधिक्याच्या अभावीं एकादी गोष्ट ताबडतोब घडवून आणणें अशक्य आहे. कौन्सिलांत केलेल्या कामाचा अहवाल मतदारास पाठविण्याचे कबूल केल्याप्रमाणें. पाठविला आहे. अहवाल छापून प्रसिद्ध करणें खर्चाचें काम आहे तरी कर्तव्य म्हणून तें केलें आहे.

७ कौन्सिलमार्फत प्रश्न विचारून अगर ठराव आणून आपले गाऱ्हाण्यांची दाद लावून घेणें असेल त्यानें शक्य तितकें करून माझी समक्ष गांठ घ्यावी अगर आपलीं गाऱ्हाणीं लिहून काढून सार्वजनिक स्वरूपाकरतां त्याजवर बऱ्याच मंडळींच्या सह्या घ्याव्या. त्यांतील मजकूर खरा असला पाहिजे. म्हणजे त्याची रचना कौन्सिलचे नियमाप्रमाणें करून प्रश्न विचारणें व ठराव आणणें हीं कामें मी करीन. प्रश्न निदान १५ दिवस व ठराव निदान २० दिवस कौन्सिल बैठकीच्या तारखेपूर्वीं मला पोहोंचले पाहिजेत नाहींतर ते त्या बैठकींत येण्याचा संभव नाहीं.

८ कौन्सिलचें मेंबर होण्यास मी उभा राहिलों व आपण मला निवडून दिलें तरी या कामास फिरतीचा खर्च, स्टॅंपचा खर्च,ऑफिसचा खर्च वगैरे खर्च सुमारें साडेतीन हजार रुपायांवर मला लागला.कोणाची समजूत अशी असेल कीं मेंबरास भत्ता मिळतो तर एकतर तो रोज दहा रुपयेप्रमाणें व आगगाडीचे फर्स्टक्लासचे $1\frac{3}{5}$ भाडें असा मिळतो परतु कौन्सिलच्या दोन बैठकीं दरसाल पुण्यास होत असल्यानें त्याचा उपयोग मला होत नाहीं. फक्त मुंबईच्या सेशनचा भत्ता व रेलवेभाडे सुमारे ४०० रुपये मिळतें व शिवाय आमचे आफिसचा व फिरतीचा खर्च दरसाल सुमारें ७५० साडे सातशे रुपये येतो. मुंबई कौन्सिलांत एकंदर १११ मेंबर असतात पैकीं ८६ निवडलेले असतात. पुणें शहराकरतां एकमेंबर व पुणें जिल्ह्याकरतां दोन मेंबराच्या जागा आहेत.

९ कोर्टफीचा कायदा, जमीनमहसुलाचा कायदा, फारेस्ट, अबकारी व तुरुंग खातें, पोलिस कमिशनर बडोदे, घरभाड्याचा कायदा, माहिती खात्याच्या डायरेक्टरचे खातें, विहिरी पाडण्याकरितां तगाई कर्ज, अध्यक्षाचा पगार, अध्यक्षाची निवड, फोटोनकलाकरतां सामान, बजेटसंबंधी वादविवाद वगैरे विषयावर मी भाषणें केलीं आहेत तीं या भागांत आलीं आहेत.

त्याचप्रमाणें

१ फारेस्ट खात्यांतील:—डिमार्केशन, सागाचे फुटव्यावरील हक्क, फॉरेस्टांतल्या जमिनी लागवडीस देणें. जनावरांचा कोंडवाडा, वाढीची फी. गुरांस मोफत वनचराई. वगैरे.

२ जमीनमहसूलखात्यांतील:—हक्कनोंदणी, गुरचरण, फिरती कामगार, अॅडमिनिस्ट्रेशन रिपोर्ट, गुरांचें संगोपन, अपुरा पाऊस, बागायत पिकांस जनावरांचा उपसर्ग, राजुरी येथील सारा यकविणारास कैद, जमिनीचें एकीकरण, हद्द निशाण्या दुरुस्ती, पिकांची माहिती, वतनदार पाटलांचा मुशाहिरा.

३ अबकारीखात्यांतील:—घोडे येथील दारूचा गुत्ता.

४ रजिस्टरखात्यांतील:—ओतूर सबरजिस्ट्रारची कचेरी.

५ लोकलबोर्ड:—अॅक्टावरील नियम, आयुर्वेदिक दवाखाने. युनानी औषधें, आळंदी पाणी पुरवठा, खेड ग्रामपंचायत निवडणूक.

६ नोकरवर्ग:—घरभाडें, (कमपनसेटरी अलावन्स) दस्तुऱ्यांची माफी, न्यायखाते कारकुनांची पगार वाढ.

७ शाळाखात्यांतील:—बी. ई. पदवीधर, प्राथमिक शाळेंत इंग्रजी शिक्षण, देशीयत्ता व इंग्रजी, एल्. सी. पी.

एस. परीक्षा, औषघोपचार, अस्पृश्यवर्गाच्या मुलांची शाळेंत वागवणूक.

८ कोर्टः—दाव्यांतील समन्साचे बजावणीचा उशीर.

९ इनामदारवर्गः—हक्कनोंदणी, मोजणी, गांवचे हिशेब, हक्काचा पैसा, चावड्या.

१० सर्वसाधारणखात्यांतीलः—शिवाजी स्मारक, पाणी पुरवठा, गुन्हेगार जाती, कऱ्हा नदीचें धरण, इंद्रायणी नावेचा कर; पाटलास तरवारी व बंदुका देणें, तळेगांव मंचर रेल्वे, मानपत्र वर्गणी, हत्यारांचे परवाने, मेलेल्या जनावरांच्या कातड्यांचे तंटे, हातमाग, इरिगेशन, मोजणी, पावसाचीं यंत्रें. कुत्र्याच्या विषावरील उपचार, ऑनररी माजिस्ट्रेट, मि. हार्निमन यांचेवरील बहिष्कार, गणेशखिंडींतील इमारती. वजनें, मापें एक नमुन्याचीं करणें.

वगैरे विषयावर उपयुक्त प्रश्न विचारले आहेत.

आम्ही विचारलेल्या प्रश्नावरून दिसून येईल कीं रयतेच्या ज्या अडचणी आमचे समोरआल्या त्या आम्ही काळजीपूर्वक सरकार पुढें मांडल्या आहेत. आम्ही स्वतःही पुष्कळ शेतकरी व व्यापारी वर्गाच्या हिताचे प्रश्न सरकारपुढें मांडले आहेत. सरकारी नोकरांच्या व गांवकामगारांच्या अडचणीही आम्ही सरकारपुढें मांडल्या आहेत. त्याचप्रमाणें इनामदार वर्गाच्या व विशेषतः शेतकरी वर्गाच्या अडचणी आम्ही सरकारपुढें मांडल्या आहेत प्रश्न विचारणें व ठराव मांडणें या कामीं फार परिश्रमपूर्वक माहिती मिळवावी लागते. आमच्या प्रश्नाचे उत्तरावरून दिसून येईल कीं शक्य तितक्या लोकांच्या अडचणी दूर झाल्या आहेत व कांहींचा विचार चालू आहे.

आम्ही आपल्या मतदाराकरतां व शेतकरी वगैरे लोकांच्या हिताकरतां पुष्कळ काम केलें आहे. तथापि इतर प्रतिनिधींनीं व त्यांचया पक्षांनीं त्यांच्या मताप्रमाणें आपलीं मतें आमच्याविरुद्ध दिल्यामुळें लोकांचा जितका उपयोग व्हावा तितका झाला नाहीं असें मोठ्या दुःखानें म्हणावें लागतें. या पुढें निवडणुकीच्या वेळीं या गोष्टीचा लोकांनीं अवश्य विचार करावा व असल्या लोक हिताविरुद्ध वागणाऱ्या लोकांस लोकांनीं आपले प्रतिनिधी निवडून द्यावें अगर कसें याचाही विचार करावा.

१० कौन्सिलचे कामकाजांत आमचे सेक्रेटरी रा. नारायण सीताराम देशपांडे यांनीं आम्हांस वेळो वेळीं उपयुक्त मदत केली आहे. त्याचप्रमाणें माझे जिल्ह्यांतलि तालुका निहाय कायद्याचे सल्लागार व शेतकऱ्यांचे व व्यापाऱ्यांचे प्रमुख पुढारी यांनीं वेळोवेळीं प्रश्न पाठवून व इतर रीतीनें माझे कामास मदत केली. व केसरी वगैरे वर्तमानपत्रकारांनीं कौन्सिलसंबंधीं माहिती प्रसिद्ध करून मदत केली आहे याबद्दल मी सर्वांचा आभारी आहें.

---

टीपः—पेज ४९ चे ठिकाणीं ८१ चुकीनें पडला आहे तरी तो ४९ समजून पुढील पानें वाचावीं.

२६२३

# नारायणराव रामजी गुंजाळ

## मेंबर मुंबई कायदेकौन्सिल (एम्. एल्. सी.)

यांनीं मुंबई कायदे कौन्सिलमध्यें विचारलेले प्रश्न व त्यांचीं सरकारचे एग्झिक्युटिव कौन्सिलर्स व मिनिस्टर्स यांनीं दिलेलीं उत्तरें व वेगवेगळ्या ठरावावर केलेलीं भाषणें व कौन्सिलमध्यें आणलेले ठराव मतदार लोकांचे माहिती करतां प्रसिद्ध करीत आहोंत.

माहे फेब्रुआरी सन १९२४ पासून माहे फेब्रुआरी–मार्च सन १९२५ पर्यंत चार बैठकींत झालेले कामाचा अहवाल.

राजनिष्टेची ठरलेली शपत घेऊन कौन्सिलांत जागा घेतली.

(१८ फेब्रुआरी १९२४)

## कोर्ट फी अक्टाचे (दुरुस्तीचें) बिल.

मिस्तर ना. रा. गुंजाळ (पुणें जिल्हा.) मराठींत भाषण.

अध्यक्ष महाराज, या सभेच्या सन्माननीय समासदांस ठाऊक आहे कीं, सरकारानें वाढवलेल्या स्टांपाच्या करास प्रयम दोन वर्षें मंजुरी मिळविली. आपल्या मागील अनुभवाचा परिणाम म्हणून हा कर कायमचा वाढावा म्हणून आतां सरकारचें मागणें आहे. स्टांपाच्या कराच्या वाढीमुळें शेतकरी व सावकार यांस फार गैरसोय झाली आहे. लहानसान सावकारांस लहान रकमा फिर्याद करून वसूल करण्याचें कठीण वाटूं लागलें आहे. या कारणाकरतां, महाराज, माझी विनंति आहे कीं, स्टांपाचा वाढता कर अजिबात बंद करावा. स्टांपाचे कराची वाढ बंद केली म्हणजे लोकांची सुमारें अठरा ते वीस लक्षांची बचत होईल आणि म्हणून महाराज माझी विनंति आहे कीं, या कौन्सिलनें योजलेल्या कायम वाढीस संमति देऊं नये. लोकांचें कल्याण करावें व सरकारच्या जुलमी राजनीतीविरुद्ध मत द्यावें; या हेतूनें स्वराज्यपक्ष कौन्सिलांत आला आहे. असें म्हणून या सभेचे सर्व पक्षाचे व सर्व दर्जाचे सन्माननीय

सभासद, मतभेद न करतां, शेतकऱ्यांच्या व लहानसान देवघेव करणाऱ्यांच्या हिताकडे लक्ष देऊन या बिलाच्या पहिल्या वाचनास विरोध करतील अशी महाराज मी आशा करतों. [ २३ फेब्रुआरी १९२४ ]

## जमीनमहसुलाच्या कायद्याच्या दुरुस्तीचें बिल.

**मि. ना. रा. गुंजाळ ( पुणें जिल्हा ) ( मराठींत भाषण ):—**

अध्यक्ष महाराज. शेतकरी अथवा इनामदार यापैकीं कोणाच्याही हिताचें हें बिल आहे असें मला वाटत नसल्यामुळें या बिलाच्या पहिल्या वाचनास विरोध करण्याकरितां मी उभा राहिलों आहें. कांहीं सन्माननीय सभासदांची अशी समजूत दिसते कीं, पहिलें वाचन मंजूर होण्यांत कांहीं नाहीं. कारण तें बिल निवडक कमिटीकडे जाईल व त्या कमिटीस वाटतील ते फरक त्यांत करतां येतील.

इनामदारांच्या संबंधाचीं जीं कलमें या बिलांत आहेत त्यासंबंधानें विचार करतां मला वाटतें कीं, इनामदारांची मालकी सरकारपेक्षां त्यांच्या जमिनीवर जास्त आहे. कांहीं शेतकरी व इनामदार वर्गाच्या सन्माननीय प्रतिनिधींनीं फारसा विचार न करतां बिलाच्या पहिल्या वाचनास पाठिंबा दिला आहे ही गोष्ट माझ्या ध्यानांत आहे. आणि मला वाटतें कीं, ते ज्यांचे प्रतिनिधी आहेत, त्या मतदारसंघास या त्यांच्या वर्तनाबद्दल त्यांस पूर्णपणें जाब द्यावा लागेल. शेतकरी व मागासलेला वर्ग यांचे प्रतिनिधी म्हणून माझी त्यांना विनंति आहे कीं या बिलानें मागासलेले वर्गाचा किंवा शेतकऱ्यांचा अगर ब्राह्मण व ब्राह्मणेतरांचा काय फायदा होणार आहे हें त्यांनीं मला दाखवावें. जर मी त्यांना असा प्रश्न विचारला तर त्याचें त्यांना समाधानकारक उत्तर देतां येईल असें मला वाटत नाहीं. म्हणून शेतकरी आणि इनामदार यांच्या दृष्टीनें या सभेनें या बिलाचें प्रथम वाचन करावें असें मला वाटत नाहीं. शेतकरी व इनामदार यांचा फायदा कशांत आहे या संबंधानें मतांत फरक झालेला आहे. व जर कोणी असें म्हणणारा असेल कीं, आपण या बिलास पाठिंबा दिलाच पाहिजे तर त्याचें म्हणणें आपण फार काळजीपूर्वक तपासलें पाहिजे. व

असें म्हणणें हेतूपूर्वक आहे अगर त्यांत कांहीं स्वार्थ आहे याचा विचार केला पाहिजे इतकें सांगून मी या बिलाचे पहिले वाचनास विरोध करतों.

[ ता. २५ फेब्रुआरी १९२४ ]

## अबकारीखात्याच्या सुपरिंटेंडंटाच्या पगाराची तपासणी.

मि. ना. रा. गुंजाळ ( पुणें जिल्हा ) ( मराठींत भाषण )

अध्यक्ष महाराज, काटकसरीच्या या दिवसांत अबकारी खात्याच्या या नोकराचा पगार वाढविणें योग्य नाहीं असें माझें म्हणणें आहे. या खात्याच्या सन्माननीय प्रधानांनीं बजेटांत पगार वाढीची ही रकम वाजवी आहे असें दाखविण्याची पुढें आणलेली सबब अशी आहे कीं, या खात्याच्या अधिकारी वर्गास १९१७ सालापासून इतर खात्यांतील नोकरवर्गास मिळाल्याप्रमाणें वाढता पगार मिळालेला नाहीं व म्हणून तो त्यांस आतां मिळालाच पाहिजे. अबकारी खातें व मीठखातें यांतील अधिकारी ज्या वेळीं एकाच यादींत दाखल होते त्यावेळीं त्यांना बढतीची आशा जास्त चांगली होती. परंतु या दोन शाखा निरनिराळ्या केल्या वेळेपासून त्यांच्या आशा खुंटल्या आहेत. ही सबब खरी आहे असें धरून चाललें तरी, ज्या अर्थी सरकारचें धोरण लोकांनीं दारू पिण्याच्या दुर्गुणापासून मोकळें व्हावें ही गोष्ट सरकारास आवडतें असें आहे व त्याच वेळीं बजेटांत ज्यास्त रकमा घालण्यांत येतात व लोकप्रतिनिधींकडून त्यांना मंजुरी मिळण्याचा प्रयत्न करण्यांत येतो, त्याअर्थी बजेटांत योजलेल्या मागणीस लोकप्रतिनिधींनीं, संमति देणें ही गोष्ट ब्राह्मणेतर पक्षाच्या व शेतकऱ्यांच्या हितास अगदीं विघातक आहे असें मला वाटतें. म्हणून मतदारसंघाच्या हिताकरतां ही वाढलेली रकम सर्व पक्षाच्या सन्माननीय सभासदांनीं, मंजूर करूं नये, अशी माझी कौन्सिलास नम्र विनंति आहे.

[ २७ फेब्रुवारी १९२४ ].

## फॉरेस्ट.

मि. ना. रा. गुंजाळ ( पुणें जिल्हा ) ( मराठींत भाषण. )

अध्यक्ष महाराज, शेतकरी वर्गाची फारेस्टासंबंधांची कांहीं गाऱ्हाणीं आहेत ही गोष्ट सन्माननीय दिवाणसाहेबांनीं सभेंत कबूल केली आहे.

परंतु त्यांचें असें म्हणणें आहे कीं, फारेस्टासंबंधाचें सरकारचें धोरण रयतेस समजत नाहीं. मला या सभेस सांगावयाचें आहे कीं, अतिशय लहानापासून अतिशय थोर फारेस्ट खात्याच्या अंमलदारापर्यंत सर्व अधिकारी शेतकरी वर्गावर जुलूम करतात. व जर फारेस्ट खात्याच्या हल्लींच्या धोरणाची योग्य चौकशी केली तर असें आढळून येईल कीं, या खात्यावरील जो हा सर्व खर्च त्यांच्या कल्याणाकरतां म्हणून केला जातो असें म्हणणें आहे तो लोकांच्या फायद्याचा मुळींच नाहीं.

उदाहरणार्थ फॉरेस्ट हद्दीचें डिमार्केशनचीच गोष्ट घ्या. हें खातें या डिमार्केशनकरतां लोकांच्या जमिनी मिळवितें, परंतु या डिमार्केशनपासून लोकांचा कांहीं फायदा होत नाहीं.

या खात्याकडून लोकांस न्याय मिळत नाहीं अशा आणखी दुसऱ्या कित्येक गोष्टी आहेत. म्हणून नऊ लक्षांची ही काटकसर ही योग्य काटकसर आहे. आपण येथें लोकांचे प्रतिनिधि म्हणून येतों. व जर आपण या सर्व अडचणी सरकारापुढें मांडणार नाहीं व हें खातें लोकांसंबंधाचें कर्तव्य करीत नसल्यामुळें ही नऊ लक्षांची काटकसर मागून घेणार नाहीं. तर आपण आपल्या मतदारसंघासंबंधाचें आपलें कर्तव्य करीत नाहीं असें होईल, इतकें म्हणून खर्च कमी करण्याच्या या सूचनेस मी पाठिंबा देतों. [ २९ फेब्रुआरी १९२४ ]

## बजेट.

### तुरुंग व शिक्षा झालेल्या लोकांच्या वसाहती.

मि. ना. रा. गुंजाळ. ( पुणें जिल्हा ) मराठींत भाषण.

ठाण्याचे सन्माननीय सभासद यांचे सूचनेस पाठिंबा देण्याकरतां, महाराज, मी उभा राहतों. महाराज, मला वाटतें कीं, तुरुंगावरील खर्चाचे मागणींत तीन लक्ष रुपये कमी करावे ही सूचना अत्यंत उपयुक्त आहे. महाराज, माझी विनंति आहे कीं, या इलाख्यांतील येरवडा व विसापूर येथील तुरुंगांतील राजकीय कैद्यांस वागविण्याची पद्धति योग्य नाहीं. खेरीज त्यांना दिलें जातें तें अन्न चांगलें ( wholesome )

नसतें. मुळशी पेट्यांतील सत्याग्रहाच्या गुन्हेगारांस फटके मारले होते. त्यांनीं एकादशीचा उपवास केला होता. आणि म्हणून दुसरे दिवशीं त्यांना दिलेलें काम त्यांचेकडून पुरें झालें नाहीं. आणि याकरतां तुरुंगाची शिस्त मोडली म्हणून त्यांस कडकपणानें फटके मारले. तुरुंगावरील अधिकारी म्हणतात कीं, तुरुंगाच्या नियमाप्रमाणें फटके मारण्यास मुभा आहे व युरोपिअन व इंडियन या सर्वांस कायदा एकच आहे. महाराज, जर मी त्यांस विचारलें कीं, एकाद्या युरोपिअन कैद्याला कधीं फटके मारले आहेत का तर त्याचें उत्तर तुरुंगावरील अधिकारी काय देतील याजबद्दल मला आश्चर्य वाटतें. त्याचप्रमाणें मला असें दाखवितां येईल कीं, राजकीय कैद्यांची आरोग्याच्या व दवापाण्याच्या कामीं फार हयगय होते. महाराज, महात्मा गांधींचें उदाहरण घ्या. त्यांचा अलिकडील आजार याच्यापूर्वी उमगला नाहीं. नशिबानुसार कर्नल मॅडॉक यांनीं अखेरच्या वेळीं त्यांची तपासणी केली. महाराज, मला वाटतें कीं, त्या आजाराच्या पूर्वीच्या स्थितींत आजाराची हयगय झाली नसती तर आल्या इतक्या थराला गोष्टी आल्या नसत्या. कर्नल मॅडॉक यांनीं महात्मा गांधींची आणखी दोन दिवस तपासणी केली नसती तर काय परिणाम झाला असता याचा या सभेनें विचार करावा. त्याचा परिणाम बहुतकरून प्राणनाशक झाला असता. अशा गोष्टींचा विचार करून माझी नम्र विनंति आहे कीं, मागितलेली रक्कम तीन लाखांनीं या सभेनें एकमतानें कमी करावी. व मला आशा आहे कीं, सन्माननीय सभासद आपसांतले पक्षभेद बाजूस ठेवून या सूचनेस अनुकूल मत देतील. [ ८ मार्च १९२४ ].

## पोलिस कमिशनर बडोदें यांचें आभारप्रदर्शन.

### मि. ना. रा. गुंजाळ. ( पुणें जिल्हा ) मराठींत भाषण.

अध्यक्ष महाराज, मि. घाटगे यांच्या अभिनंदनाच्या या ठरावास मनापासून पाठिंबा देण्यास मराठा म्हणून मला फार समाधान वाटतें. सबइन्स्पेक्टर मि. नलवडे यांचें नांवाचा उल्लेख करण्याची जरूरी होती. असें मला वाटलें. व हें आतां केल्यामुळें मला फार आनंद झाला आहे.

मि. घाटगे हे बडोदा संस्थानचे नोकर आहेत. घाटगे आणि नलवडे यांच्या शूरपणाच्या कृत्यानें, जरूरीच्या वेळीं शूरपणा दाखविण्याची लायकी इंडियन लोकांत नाहीं हा दोष पूर्णपणें खोटा ठरविला आहे. देशी संस्थानांतल्या पोलिस लोकांपेक्षां इंग्रजी हद्दींतले पोलिस लोक जास्त हुषार आहेत अशी कांहीं युरोपिअन लोकांची समजूत आहे. वरील उदाहरणावरून दिसून येईल कीं, वरिष्ठ दर्जाच्या व गुणाच्या माणसांची देशी संस्थानांत उणीव नाहीं. [ १२ मार्च १९२४. ]

## मि. हार्निमन यांचे हिंदुस्थानास परत येण्यावर असलेला बहिष्कार काढून टाकणेबद्दल.

**मि. ना. रा. गुंजाळ.** ( पुणें जिल्हा ) मराठींत भाषण करून ठरावास पाठिंबा दिला. [ १९ मार्च १९२४. ]

**मि. ना. रा. गुंजाळ,**

( १ ) पुणें जिल्ह्यांतील खेड तालुक्यांतील कांहीं नक्त नेमणूकदारांस, दरसाल कायमची नक्त नेमणूक घेण्याच्या ऐवजीं पंचवीसपट रकम घेण्यास आपली खुषी आहे कां, असें सरकाराकडून विचारलें आहे ही गोष्ट खरी आहेकां याची माहिती मेहरबानी करून सरकार देईल काय ?

( २ ) जर असें असेल तर अशी व्यवस्था करण्याची सरकारचीं काय कारणें आहेत ?

**आनरेबल मि. मेथा.**

**उत्तरः**( १ ) होय.

( २ ) डाक्तर एम्. बी. वेलकर यांनीं ता. १२ मार्च १९२४ रोजीं विचारलेल्या नंबर २ च्या प्रश्नास दिलेल्या उत्तराकडे मेंबरानें लक्ष द्यावें.

[ नक्त नेमणुका व त्यासंबंधाच्या वारसाच्या चवकश्या या संबंधाचें काम कमी करण्याकरतां काटकसर कमिटीनें अशी शिफारस केली आहे कीं, वीस रुपयांच्या आंतील सर्व नक्त नेमणुकांची रकम एकदम देऊन टाकावी. कमिशनरांना असें कळविण्यांत आलें आहे कीं या

प्रश्नाची त्यांनीं चौकशी करावी व अशा नक्त नेमणुकांस पैशाची व तशीच सामाजिक किंमत आहे ही गोष्ट लक्षांत घेऊन त्यांनीं या बाबतींत रिपोर्ट करावा.

सरकार ठराव नंबर ४४८८ तारीख २४ जुलई १९२३ यांतील कलम १८ ची या संबंधाची नकल कौन्सिलच्या टेबलावर ठेविली आहे. ]

# दुसरें सेशन.

## घरभाड्याच्या कायद्याच्या दुरुस्तीचें बिल.

**मि. ना. रा. गुंजाळ.** ( मराठींत भाषण केलें. ) महाराज या बिलाचे पहिले वाचनास मी आनंदानें संमति देतों. २० फूट लांब व २० फूट रुंद येवढ्या एका खोलींत सुमारें १५० माणसें एक ठिकाणीं रहातात. हें खरोखर भरंवसा ठेवण्यासारखें नाहीं. घराचे मालक संकटावस्थेतील भाडेकरूंचा यत्किंचितही विचार न करतां ४० ते ६० रुपये असें एका खोलीचें विलक्षण भाडें घेतात. हें पाहून व जागे संबंधीं भाडेकरूंची दयार्द्र स्थिति ऐकून या सभेंत व सभे बाहेर आपणा सर्वांस या बिलास कोणी विरोध केल्यास आश्चर्य वाटेल. मुंबईचे सन्मानीय सभासदानें मुंबईतल्या भाडेकरूंच्या दुःखाचें, त्यांचे घरधनी त्यांस कसें वागवितात व अतिशय भाड्यामुळें त्यांस किती दुःखें सोसावीं लागतात याचें प्रत्यक्ष चित्र आपल्यापुढें मांडलें आहे. कांहीं भाडेकरू घरधन्यापेक्षां श्रीमंत असतात असा एक मुद्दा पुढें आलेला आहे. भाडेकरू भाड्याच्या घरांत राहतात ही एकच गोष्ट त्यांची सांपत्तिक स्थिति जशी दाखविली जाते तशी नाहीं हें दाखविण्यास पुरेशी आहे.

मुंबईचे सन्माननीय सभासद ( मि. नरीमन ) यांनीं, जरी ते घरधन्याच्या वर्गातले आहेत तरी गरीब दुःखभोगणाऱ्या भाडेकरूंच्या सहानुभूतीमुळें, बिलास संमति दिली आहे. उलटपक्षीं मुंबईचे दुसरे सभासद.

**प्रेसिडेंट.** या सन्माननीयसभेंत सन्माननीय सभासदानें सभासदामध्यें तुलना करूं नये. मला तसें करूं देतां येत नाहीं.

**मि. गुंजाळ.** मी मनापासून बिलांस पाठिंबा देतों व कौन्सिलांत एकमतानें तें मंजूर होईल अशी आशा करतों.

## माहिती खात्याचे डायरेक्टरचें खातें.

**मि. ना. रा. गुंजाळ.** ( मराठींत भाषण केलें. )

अध्यक्ष महाराज, माहिती खात्याचे डायरेक्टर यांस दिलेली रक्कम पुन्हां द्यावी अशाविषयीं आपल्यापुढें सूचना आहे. या सूचनेचा विचार

फक्त चार महिन्यांपूर्वी याच कौन्सिलांत सविस्तर व पूर्णपणें होऊन ती या कौन्सिलनें नामंजूर केली होती. या कौन्सिलनें निर्णय दिला होता कीं, माहिती खात्याचे डायरेक्टरचे कचेरीची मुळींच जरूरी नाहीं. आणि अशा कचेरीची जरूरी नाहीं असा या कौन्सिलनें निकाल दिला असूनही तीच मागणी आतां पुन्हां पुढें आणली आहे. सरकारच्या बाजूनें अशी सूचना यावी याचें या सभागृहाचे बाहेरील लोकांस फार आश्चर्य वाटेल अशी माझी खात्रीआहे. चारच महिन्यांपूर्वी भर कौन्सिलांत सर्व बाजूंनीं या गोष्टीचा वादविवाद होऊन त्यावेळीं निश्चित निर्णय लागला आहे.

या सर्व गोष्टी बाजूस ठेवल्या तरी माहिती खात्याचे डायरेक्टरकडून जी माहिती पुरविली जात असते ती फक्त एकतर्फेची असते. ती माहिती सरकारच्या बाजूचीच असते व लोकांच्या बाजूची नसते. ती नेहमीं सरकारची बाजू मांडते व लोकांची किंवा सर्व जनतेची बाजू त्या माहितींत मांडली जात नाहीं. म्हणून मला वाटतें कीं, ही सूचना आपण सर्वांनीं एकमतानें फेटाळली पाहिजे. हीच मागणी कौन्सिलापुढें विचाराकरतां चारच महिन्यांपूर्वीं आली व त्यावेळीं तिला सर्व निरनिराळ्या पक्षाच्या सन्माननीय सभासदांनीं विरोध केला होता. या गोष्टीकडे व सरकारच्या खर्चाची काटकसर करण्याच्या दूरदृष्टीकडेही लक्ष देतां आणि विशेषतः हीं सुमारें वीस हजार रुपायांची रक्कम अयोग्य रीतीनें खर्च होईल हें माहीत असतां—आणि सरकारास यापेक्षां अवश्य कामाकडे खर्चण्यास पैसा पाहिजे आहे—मला वाटतें कीं ही मागणी मंजूर करावी हें आपणास बाजवी नाहीं. जें खातें लोकांच्या वर्ताची कांहीं बातमी देत नाहीं, परंतु सरकारच्याच बाजूची बातमी देतें. त्याचा खर्च चालविण्यास पुनः मदत देण्यास कौन्सिलनें मजुरी दिली तर ती गोष्ट फार शोचनीय होईल. म्हणून या कौन्सिलांतील सर्व पक्षाच्या सभासदांनीं एकमतानें ही मागणी नाकबूल करावी अशी माझी सर्व सन्माननीय सभासदांस विनंति आहे.

कांहीं वर्तमानपत्रकर्त्यांकडून माहितीच्या डायरेक्टरची कचेरी चालू ठेवावी अशी मागणी आली आहे अशी या सूचनेच्या बाजूनें दुसरी एक

मुद्याची गोष्ट आणली जाते. परंतु माझें म्हणणें आहे कीं लोकांच्या दृष्टीनें या पत्रांची परिस्थिति काय आहे ती आपण पाहिली पाहिजे.

ही सूचना या कौन्सिलचा मान व रुबाब यांच्या बचावाकरतां फेटाळून लावली पाहिजे. म्हणून या कौन्सिलपुढें असलेल्या या सूचनेस मी जोरानें विरोध करतों. ( पानें ४४१-४४२ )

## विहिरी पाडण्याकरितां तगाई कर्ज.

पानें ६९०-६९१-६९२.

**मि. ना. रा. गुंजाळ.** [ मराठींत भाषण केलें. ]

अध्यक्ष महाराज, शेतकऱ्यांस विहिरी फोडण्याकरतां बिन व्याजी तगाई देण्याच्या सन्माननीय सभासद ( मि. साहेबा. ) यांच्या ठरावास पुढील कारणाकरतां मी पाठिंबा देतो.

पहिल्यानें:—मी शेतकऱ्याच्या कुळांत शेतकरी जन्मास आलों.

दुसरें:—मी शेतकरी हितसंवर्धक मंडळाचा एक सेक्रेटरी आहे.

तिसरें:—हा ठराव शेतकऱ्यास अतिशय जिव्हाळ्याच्या फायद्याचा आहे.

आणि चवथें:—या ठरावास पाठिंबा देणें हें माझें कर्तव्यकर्म आहे. या सांगितलेल्या कारणाकरतां मी फार मनापासून ठरावास पाठिंबा देतों.

इलाख्याच्या पाणी पुरवठ्याच्या संबंधानें शेतकी खात्याकडून जी माहिती पुरवली जाते तिजपासून शेतकऱ्यांस कांहीं उपयोग होत नाहीं. पाटपाणी खात्याकडून शेतकऱ्यांस जें पाणी दिलें जातें तें पुरेसें नसून तें शेतकऱ्याच्या मनाप्रमाणें शेताच्या निरनिराळ्या भागास पुरवले जात नाहीं. शेताच्या त्याच त्या तुकड्यास दरसाल पाणी दिल्यानें व त्याच त्या तुकड्यावर पिकें काढल्यानें तीं तुकडीं ओलसर होतात व पूर्वीं प्रमाणें ती पिकें देत नाहींत. खेरीज अलिकडे इरिगेशनचा कायदा जुलमाचे व अडचणीचे मूळ झाला आहे. इरिगेशन खात्याविरुद्ध सरकारकडे ज्या तक्रारी आल्या आहेत. त्या विचाराकरतां कौन्सिल टेबलावर ठेवल्या तर जें मी म्हणतों त्याची सत्यता सन्माननीय सभासदांस पटेल अशी मी कौन्सिलास खात्री देतों. आतां ज्या जमिनीस पाणी पुरवलें

जातें त्या जमिनीस आणखी दहा वर्षें विसावा दिला पाहिजे अशा करतां कीं, त्या सुकतील व त्यांत कांहीं पीक येण्यास त्या पात्र होतील कारण ओलाव्यामुळें त्यांत कांहीं राम राहिलेला नाहीं.

दुसरा मुद्दा असा आहे कीं, विहिरींची संख्या पूर्वी ३९२७०० होती व हल्लीं त्या संख्येची वाढ ढोकळ मानानें ४३१००० झाली आहे. खोदण्याच्या यंत्राचा फायदा शेतकऱ्यांनीं घेतला आहे व त्या योगानें त्यांचा फायदा झाला आहे. यावर माझें उत्तर आहे कीं पहिल्यांदा विहिरींची संख्या उगीच फुगविली आहे. खेरीज त्या विहिरींपैकीं सर्व वर्षभर पाणी किती विहिरी पुरवतात, चांगल्या पावसामध्येंच किती विहिरींना पाणी असतें व किती निरुपयोगी व कोरडया आहेत, याची माहिती शेतकी खात्याकडून मिळालेली नाहीं. ज्याअर्थी ही माहिती पुरवलेली नाहीं त्याअर्थी खोदण्याच्या यंत्राचा शेतकऱ्यांनीं उपयोग केला आहे व विहिरींची संख्या वाढवून त्या योगानें आपला फायदा करून घेतला आहे हें म्हणणें संशयात्मक आहे. खोदण्याच्या यंत्राचें काम चालविण्यास शेतकऱ्यांस काय खर्च आला त्याचा आकडाही कोठें दिलेला नाहीं. या कौन्सिलच्या सन्माननीय सभासदांस शेतकऱ्याजवळ चवकशी केली असतां खात्रीनें कळेल कीं, खोदण्याचें यंत्र त्यांच्या मागणीप्रमाणें व त्याचा ज्यावेळीं त्यास उपयोग करतां येईल त्यावेळीं त्यांस पुरवलें जात नाहीं.

तिसरा मुद्दा. महाराज पुणें जिल्ह्यांतील इंदापूर तालुका व दौंड पेटा व इतर जिल्ह्यांतील असलेच तालुके यांची स्थिति आपण लक्षांत आणाल तर, शेतकऱ्यांची भयंकर स्थिति पाहून आपण भयचकित व्हाल. इंदापूर तालुका व दौंड पेटा यांत गेल्या दहाबारा वर्षांत क्वचित् पाऊस पडला असेल. विक्टोरिया तळें व तालुक्यांतील व पेट्यांतील अर्धवट पुऱ्या केलेल्या पाण्याच्या दुसऱ्या योजना यापासून शेतकऱ्यांस कांहीं उपयोग होत नाहीं. खेरीज शेतकऱ्यांस असें सांगण्यांत येतें कीं, सरकार वरवंड येथें विक्टोरिया तळें बांधीत आहे. आणि तें पुरें झालें म्हणजे शेतकऱ्यांस आपल्या शेताकरितां पुरेसें पाणी मिळेल आणि म्हणून त्यांनीं आतां नवीन विहिरी फोडण्याचे श्रम करण्याचें कारण नाहीं असें मी ऐकतों. आपल्या जमिनींत विहिरी खणण्याकरतां जेव्हां ते पैसे मागतात

तेव्हां त्यांस असें सांगण्यांत येतें. व अशी स्थिति गेली दहापंधरा वर्षें चालू आहे. विक्टोरिया तळें केव्हां पुरें होणार आहे व त्याचें पाणी आपल्या शेतास पुरवून शेतकरी कधीं सुखी होणार आहेत हें मला तरी समजत नाहीं. शेतकी खात्याचे अधिकारी मजबरोबर इंदापूर तालुका व दौंड पेटा यांत येण्याचे जर परिश्रम घेतील तर याविषयीं मी त्यांची खात्री करण्यास तयार आहें कीं, माणसाच्या व जनावराच्या पिण्याच्या उपयोगी पाण्याची स्थिति अत्यंत भयप्रद आहे. आणि पाण्याच्या अभावीं गांवें ओसाड पडत आहेत पुणें जिल्ह्यांत एका तालुक्यांत बहुधा सुमारें १५० खेडेगांव असतात. व इलाख्याच्या प्रत्येक तालुक्यांत बहुधा गांव व वाड्या मिळून इतकीच संख्या असते. या १५० गांवांपैकीं सुमारें १०० गांवें पाणी नसल्यानें हाल काढीत आहेत. शेतकी खात्याकडून या कौन्सिलास जी माहिती पुरविली जाते ती एकाद्या तालुक्याच्या चांगल्या भागासंबंधीच असते असें मला वाटतें. या सन्माननीय सभेच्या नजरेस एकाद्या तालुक्याच्या हाल काढीत असलेल्या भागाची माहिती आणली जात नाहीं. यांतील गूढ मला समजत नाहीं. सन्माननीय ठराव आणणार ( मि. साहेबा ) यांस शेतकऱ्याच्या दुःखांची माहिती असल्यामुळें त्यांनीं हा ठराव आणला आहे.

ज्यांस त्यांनीं निवडून दिलें आहे व त्यांचे कामाची सेवा करणें या बुद्धीनें जे या सन्माननीय सभेंत बसलेले आहेत अशा शेतकऱ्यांच्या प्रतिनिधींस विनंती आहे कीं, इतर गोष्टींतील कोणतेही भेदभाव मनांत न आणतां त्यांनीं या ठरावास पाठिंबा द्यावा. कारण, शेतकऱ्यापासून मतें मिळविण्याच्या वेळीं जी भाषा त्यांनीं वापरली आहे ती प्रतिनिधि पाळतात किंवा नाहीं हें पाहण्याची हा ठराव ही कसोटी आहे असें मला वाटतें. महाराज, ज्यांस शेतकऱ्यांनीं निवडलें आहे व शेतकऱ्यांचा प्रतिनिधि असण्याबद्दल ज्यांस अभिमान वाटतो व जो वेळोवेळीं असे उद्गार काढीत असतो असा एक प्रधान या सभेंत आहे असें माझें म्हणणें आहे. परंतु महाराज, आतां त्याची या ठरावास पाठिंबा देण्याची वेळ आली आहे व या कर्तव्यकर्मांत जर चूक झाली तर सर्व इलाख्यांतील शेतकरी लोकांचे त्याच्याविषयीं काय मत होईल याचा त्यानें

विचार करावा असें मला वाटतें. जर त्या प्रधानानें या ठरावास आतां पाठिंबा दिला नाहीं तर शेतकरी लोक व मागासलेले वर्ग यांस असें वाटणें अगदीं स्वाभाविक आहे कीं, निवडणुकीच्या वेळीं आपणांस यांनीं पोकळ आशा उत्पन्न करून आपणास निवडून घेतलें व त्यास मोठ्या पगाराची जागा मिळतांच शेतकऱ्यांच्या हितास अत्यंत उपयोगी अशा ठरावाच्या विरुद्ध त्यांनीं मत दिलें असें महाराज मला वाटतें. मी जें काय बोललों आहे त्याचा विचार करून ते प्रधान या ठरावास अनुकूळ मत देतील असें मी सुचवितों.

चवथा मुद्दा असा आहे कीं, सर्व खात्याची जमा व खर्च यांचा विचार केला तर शेतकऱ्याकडून होत असलेली जमा सर्वांत जास्त आहे व त्यांच्या कल्याणाकरितां होणारा खर्च सर्वांत कमी आहे असें मला वाटतें. मोठ्या अधिकाऱ्यांचे मोठे पगार धरून राज्य कारभारावर होणारा खर्च बहुतेक शेतकऱ्याकडून पुरवला जातो. या सर्व गोष्टींचा विचार करून, विहिरी खणण्यास शेतकऱ्यांस तगाई बिनव्याजी द्यावी. इतकी तरी मेहरनजर सरकारनें शेतकऱ्यांस दाखवावी. या विषयावर एका जबाबदार मित्राशीं शेतकऱ्यासंबंधाचे सरकारचे धोरणावर वाटाघाट करतांनां त्या अधिकाऱ्यानें मला असें सांगितल्याचें आठवतें कीं, शेतकऱ्याविषयीं कळवळा असल्याचा अभिमान दाखविणारें सरकार त्यांना जिवंत तरी ठेवूं शकेल किंवा नाहीं याची त्यास शंका आहे. इतकें सांगून महाराज, मी ठरावास पाठिंबा देतों.

## गणेशखिंडींतील गव्हर्नरसाहेबांच्या घराशेजारील इमारती.

**मि. ना. रा. गुंजाळ** १ अ. पुण्यानजिक गणेशखिंडींत सरकार वाड्यापासून पाऊण मैलाच्या घेरांत घरें बांधूं नयेत अशा-बद्दल जनतेस मनाई करणारा हुकूम सरकारानें काढला आहे काय, याची माहिती सरकार मेहेरबानी करून देईल काय?

( ब ) जर असें असेल तर असें करण्यास काय कारणें आहेत ?

( क ) जर असेल तर पाऊण मैलाचे अंतर म्हणजे सरकारवाड्या-

पासून अगर सरकारवाड्याच्या आवाराच्या तारेच्या कुंपणा-
पासून समजावयाचें ?

आनरेबल मि. मेथा. अ. नाहीं.

ब, क अधिक प्रश्न उत्पन्न होत नाहीं.

## आळंदी पाणीपुरवठ्यास देणगी.

मि. ना. रा. गुंजाळ अ. पुणें जिल्ह्यांपैकीं खेड तालुक्यांतील आळंदी म्युनिसिपालिटीस इंद्रायणी नदींतून गांवच्या व आळंदीस येणाऱ्या हजारों यात्रेकरूंच्या पाणी पुरवठ्या-करतां सरकारकडून साठ हजार रुपयावर देणगी मिळाली होती व ती परतघेतली गेली ही गोष्ट खरी आहे कीं नाहीं, ही माहिती सरकार देईल काय ?

ब. जर असें असेल तर देणगी परत घेण्याचें कारण काय होतें ?

आनरेबल मि. हिदायतल्ला अ. होय.

ब. लढाईमुळें काटकसरीची अत्यंत जरूरी उत्पन्न झाली हें एक अंशतः कारण व दुसरें कारण कीं, मि. राजर्स डेप्युटी कलेक्टर, यांनीं कार्तिकी यात्रेंत तूर्तातूर्त केलेल्या पाणी पुरवठ्याच्या सोयीचा उपयोग झाला. या दोन कारणानें ती योजना तहकूब झाली व रक्कम परत घेण्यांत आली.

[ मि. पी. जी. जोशी—ती योजना आतां हातांत घेतली जाईल असे धरून मी चालू काय ?

आनरेबल मि. हिदायतल्ला. जर ती म्युनिसिपालिटीही अर्ज करील तर दुसऱ्या म्युनिसिपालिट्यांच्या अर्जांबरोबर त्याचाही विचार होईल.

## वजनें व मापें एक नमुन्याचीं करणें.

मि. ना. रा. गुंजाळ. मुंबई इलाख्यांतील वजनें व मापें एक नमुन्याचीं करण्यासंबंधाचा विचार कोठवर आला आहे याची माहिती सरकार देईल काय ?

**आनरेबल मि. हिदायतल्ला.** सभासदानें सरकार ठराव नंबर १६१२ तारीख ३१ जानेवारी १९२२ आणि २ मे १९२३ यांच्या नकला कौन्सिलच्या टेबलावर ठेवल्या आहेत त्या पहाव्या. कमिटीचा रिपोर्ट ९ मे १९२४ रोजीं आला आहे व त्याचा सरकारांत विचार चालू आहे.

## अस्पृश्य वर्गाच्या मुलांची शाळेंत वागवणूक.

**मि. ना. रा. गुंजाळ** अ. पुणें जिल्ह्यांतील खेडेगांवांत, डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर पुणें यांनीं आपल्या ताब्यांतील सर्व शिक्षकांस अस्पृश्य वर्गाच्या मुलांस कसें वागवावें यासंबंधानें कांहीं वटहुकूम काढल्यामुळें, फार असंतोष पसरला आहे या गोष्टीची सरकारास जाणीव आहे का ?

ब. सरकारकडे अगर पुण्याच्या डिस्ट्रिक्ट लोकलबोर्डाकडे पुणें जिल्ह्यांतील कांहीं खेडेगांवांतील धर्मनिष्ठ हिंदु लोकांकडून या बाबतींत कांहीं तक्रारी आल्या आहेत कां, याची माहिती सरकार देईल का ?

क. असें असेल तर सरकारांनीं या बाबतींत काय तजवीज केली आहे.

**आनरेबल मि. जाधव**

अ. प्रश्नाच्या या भागाचें उत्तर देण्याचें साधन सरकाराजवळ नाहीं.

ब. या भागाबद्दल उत्तर सरकारपुरतें पहावयाचें तर नकारार्थी आहे.

क. पुणें जिल्हा लोकलबोर्डाकडे कांहीं तक्रारी आल्या असल्यास त्याची माहिती सरकारास नाहीं.

[ मि. पी. जी. जोशीः—लोकलबोर्डाकडून कांहीं माहिती मागविली होती का ? ]

**आनरेबल मि. जाधव.** लोकलबोर्डाच्या कामांत विनाकारण ढवळाढवळ करण्याची सरकाराची इच्छा नसल्यामुळें कांहीं माहिती मागविली नाहीं.

**मि. जोशीः**—दुसऱ्या कोणत्या तरी एकाद्या लोकलबोर्डाकडून माहिती मागविली होती का ?

**ऑनरेबल मि. जाधव.** त्यांच्या कामांत ढवळाढवळ केल्याबद्दल लोकलबोर्डास राग येईल अशी भीति वाटल्यावरून प्रश्नाचें उत्तर नकारार्थी आहे.

**मि. शिवदासानीः**—जर अशी माहिती सर्व लोकलबोर्डांकडून मागविली असती तर ती विनाकारण ढवळाढवळ झाली असती कां ?

**ऑनरेबल मि. जाधव.** शक्य आहे.

**मि. अडवानी** कोणत्याही मार्गानें माहिती मिळविण्याचा यत्न सरकारने केला कां ?

( उत्तर मिळालें नाहीं. )

---

## चौथे लिस्ट.

**मि. ना. रा. गुंजाळ** सरकार माहिती देईल काय ?

( अ ) कांहीं जमिनी फारेस्ट डिमार्केशन हद्दींत असल्याबद्दल पुणें जिल्ह्यांतून सरकारकडे कांहीं तक्रारी आल्या आहेत का ?

( ब ) फारेस्ट डिमार्केशन हद्दींत असणाऱ्या सागाच्या व इतर झाडावर स्वामित्वाची रक्कम असलीं झाडें दुसरे कोठें असलीं तर जी घेतली जाते तिजपेक्षां जास्त आकारली जाते ही गोष्ट खरी आहे का ?

( क ) डिमार्केशन हद्दींतील सागाच्या व इतर झाडाच्या फुटव्यावर मालकी कोणाची, यासंबंधीं कांहीं नियम आहे का ?

( ड ) जर अशा नियमाअन्वयें फुटव्यावर सरकारची मालकी असेल तर जमिनीच्या मालकांस असा फुटवा उगवल्यावर सदर जमिनींत आपलीं गुरें चारण्यास परवानगी आहे कां ?

**ऑनरेबल मि. देहळवी** चौकशी चालू आहे.

---

## सहावें लिस्ट.

## पुणें जिल्ह्यांतील खेड तालुक्यांतील हक्कनोंदणी.

**मि. ना. रा. गुंजाळ.** (अ) पुणें जिल्ह्यांतील खेड तालुक्यांतील कान्हेवाडी बुद्रुक, पाळू, कोरेगांव व आणखी थोड्या दुसऱ्या इनाम गांवच्या इनामदारांकडून व गावकऱ्याकडून, हक्कनोंदणीच्या कामाकरता मोजणीच्या कामाकरितां आलेला खर्च वसूल करण्याचा कां हुकूम करण्यांत आला याचा खुलासा सरकार करील कां ?

(ब) गांवकरी व खातेदार नात्यानें इनामदार यांच्या संमतिशिवाय हीं कामें सुरू केलीं होतीं ना ?

**ऑनरेबल मि. मेथा.** माहिती मागविली आहे.

---

## आठवें लिस्ट.

## शिवाजी स्मारक.

**मि. ना. रा. गुंजाळ.** पुणें जिल्ह्यांतील जुन्नर शहरा जवळील शिवनेरी किल्यावरील शिवाजीची जन्मभूमी, उत्सव वगैरे करण्याकरतां, लोकांच्या स्वाधीन करण्यासंबंधीं जो पत्रव्यवहार जुन्नरचे लोक व पुण्याचे कलेक्टर यांजमध्यें झाला तो सरकार कौन्सिलच्या टेबलावर ठेवील कां ?

**ऑनरेबल मि. कावसजी जहांगीर.** लोकांस जुन्नरजवळील शिवनेरीकिल्ला देण्याच्या बाबतींत जुन्नरचे लोक व कलेक्टर पुणें यांजमध्यें कांहीं पत्रव्यवहार झालेला नाहीं. तथापि सन १९१९ मध्यें तेथील जुन्या स्मारकाची कांहीं दुरुस्ती करण्यासंबंधानें कांहीं पत्रव्यवहार चालला होता असें दिसतें. सार्वजनिक वर्गणीनें अगर खाजगी देणगीनें पैसे जमविता येत असल्यास इंजनेर खात्यास दुरुस्तीचें काम करण्यांत सांगूं असे व्ही. जी. पुराणिक व एस्. आर. बेडेकर यांस कळविण्यांत

आले होतें. तो पत्रव्यवहार पुराणिकांच्या मरणानंतर म्हणजे सुमारें १९२० सालीं थांबला.

[ मि. कोठारीः—सरकार स्वतः दुरुस्ती करण्याचें काम करण्याचा विचार करील कां ?

**ऑनरेबल मि. कावसजी जहांगीर.** मला वाटतें नाहीं. तथापि ज्या लोकांनीं सरकारशीं पत्रव्यवहार केला ते सार्वजनिक वर्गणीनें कांहीं पैसा जमविण्याचें हातीं घेतील तर सरकार शक्य ती सर्व मदत देईल. सन्माननीय सभासद जर येऊन मला भेटतील तर या विषयाकडे शक्य तितकें लक्ष मी देईन. ]

---

## नववें लिस्ट.

## फॉरेस्ट डिमार्केशन हद्दींत झाडें तोडणें.

**मि. ना. रा. गुंजाळ.** अ. फारेस्ट डिमार्केशन हद्दींत असलेलीं साग व रायवळ झाडें तोडण्याचे अशा जमिनीचे मालकांस काय हक्क आहेत, याची माहिती सरकार देईल कां ?

ब. मथुबाई उर्फ रमाबाई सुदामे यांस गोरेबुद्रुक तालुका हवेली जिल्हापुणें, आपल्या जमिनींतील सर्वे-नंबर २३ आणि २४ यांतील सागाचीं व इतर झाडें तोडण्यास अलीकडे कन्सरवेटर ऑफ फारेस्ट मध्यभाग यांनीं मनाई केली आहे, ही गोष्ट खरी आहे का ? याची माहिती सरकार देईल का ?

**ऑनरेबल मि. देहलवी.** चौकशी चालू आहे.

## पुणें जिल्ह्यातील खेड तालुक्यांतील घोडें येथील दारूचा गुत्ता.

पुणें जिल्ह्यांतील. खेड तालुक्यांतील आंबेगांव पेठ्यांतील. घोडेगांवच्या हद्दींत, या बाबतींतले पूर्वीचे हुकुमाविरुद्ध, देशी दारूचें दुकान ठेवण्यास कां परवानगी दिली याची माहिती सरकार देईल का ?

ग्रंथ

आनरेबल मि. देहलवी या गांवच्या हद्दीच्या आंत, कोणतेंही देशी दारूचें दुकान ठेवण्यास परवानगी दिलेली नव्हती. खऱ्या गोष्टी अशा आहेत कीं, परवानेवाल्यानें परवानगी दिलेली दुकानाची जागा गांवाबाहेर होती, तेथून गांवांत आपलें दुकान आणण्याची परवानगी मागितली. व परवानगी मिळेल अशा समजुतीनें दुकान प्रत्यक्ष गांवांत आणलें. तथापि त्याला कळविण्यांत आलें आहे कीं, परवानगी असलेल्या जागेंत व जर ती पहिली जागा मिळत नसेल तर दुसऱ्या योग्य जागेंत दुकान न्यावें.

[ मि. देव—परवानेवाल्यास परवानगी मिळेल अशा समजुतीवर आपले दुकान का हलवूं दिलें ?].

उत्तर नाहीं.

३

# तिसरें सेशन

## नॉनग्याझिटेड आफिसरलोकांस घरभाडें वगैरे.

**मि. ना. रा. गुंजाळ.** अ कांहीं सरकारी खात्याच्या नॉनग्याझिटेड आफिसर लोकांकडून पुणें, मुंबई, साष्टी व कराची या शहरीं आपणांस घरभाडें वगैरे मिळावें म्हणून कांहीं अर्ज सरकारकडे आले आहेत काय त्याची माहिती सरकार देईल का ?

(ब) जर आले असतील तर त्या अर्जांबद्दल पुढें काय तजवीज झाली तें सरकार सांगेल का ?

**ऑनरेबल मि. एच्. एस्. लॉरेन्स**

अ. होय.

ब. या प्रश्नाचा अद्यापि सरकारांत विचार चालू आहे.

## कुलाबा व रत्नागिरी जिल्ह्यांतील पाणी पुरवठा.

**मि. ना. रा. गुंजाळ** कुलाबा व रत्नागिरी जिल्ह्यांतील पाणी पुरवठ्याच्या सुधारणेकरतां सन १९२३–२४ व सन १९२४।२५ या सालांत किती रकमा मंजूर झाल्या होत्या व त्यांचा खर्च कसा झाला अगर होत आहे ही माहिती सरकार देईल कां ?

**ऑनरेबल मि. जाधव.**

माहिती मागविली आहे.

**ऑनरेबल मि. जाधव.** सभासदास पाहिजे असलेली माहिती सोबतच्या तक्त्यावरून मिळेल.

| जिल्हा. | वर्षे. | सरकारी मदत. | पाणी पुरवठा कामावरील एकंदर खर्च |
|---|---|---|---|
| कुलाबा | १९२३-२४ | ५१२ | ४२४० + |
| | १९२४-२५ | १२१२ | ४५०० + |
| रत्नागिरी | १९२३-२४ | ६०९ | १८२८ × |
| | १९२४-२५ | ७०७ | २१२२ * |

कसा खर्च केला अगर करण्याचें योजिलें

+डिस्ट्रिक्ट लोकलबोर्डानें जुन्या विहिरींच्या दुरुस्तीकरतां व धरणांच्या दुरुस्तीकरतां व नव्या विहिरी बांधण्याकरतां सर्व रक्कम खर्च केली.

×१९२२-२३ मध्यें काढलेले रुपये ५८१ यांत आहेत. ही रक्कम बांधण्याकडे व रिपेरीकडे व धरणाचे बांधाकडे खर्च केली.

*ही रक्कम विहिरींच्या बांधकामाकडे व दुरुस्तीकडे व बंधाऱ्याकडे वगैरे खर्च केली जाईल.

## मुंबई इलाख्यांतील बी. इ. पदवीधरांस माफी.

**मि. ना. रा. गुंजाळ.**

मुंबई युनिव्हर्सिटीच्या बी. इ. पदवीधरांस, इन्स्टिटयूट ऑफ सिव्हिल एंजिनिअर्स, लंडनच्या असोसिएटेड मेंबरशिपच्या परीक्षेपैकीं भाग A आणि B यांत पास होण्याची माफी, इंग्रजी साम्राज्यांतील कांहीं युनिव्हर्सिटीस दिलेली आहे त्याप्रमाणें मिळत नाहीं. ही माहिती सरकारास आहे कीं नाहीं याचा खुलासा सरकार करील का ?

**ऑनरेबल मि. जाधव.** माहिती मागविली आहे.

## पुणें जिल्ह्यातील अस्पृश्य मुलें.

**मि. ना. रा. गुंजाळ.**

पुणें जिल्ह्यांतील कांहीं खेडेगांवच्या रहिवाशाकडून डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर पुणें यांजकडे, एकाच शाळेंत अस्पृश्य मुलांस इतर मुलांबरोबर बसू देतात म्हणून कांहीं तक्रारी अर्ज आले आहेत का ? याची माहिती सरकार देईल का ?

( ब ) आले असल्यास त्यांची काय वाट लागली ?

**ऑनरेबल मि. जाधव.** चवकशी चालू आहे.

## खेड तालुक्यांतील गुरचरण जमीन.

**मि. ना. रा. गुंजाळ.**

पुणें जिल्ह्याच्या खेड तालुक्यांत ज्यांस पुरेसें गायरान नाहीं अशीं कांहीं गांवें आहेत कां ? याची माहिती सरकार देईल कां ?

ऑनरेबल मि. ए. एम्. के. देहलवी एकंदर गांवें १७८ यांपैकीं ५७ गांवास पुरेसें गायरान नाहीं व ८५ गांवास मुळींच गायरान नाहीं.

## पुणें जिल्ह्यांतील खेड तालुक्यांतील हक्क नोंदणी.

**मि. ना. रा. गुंजाळ.**

अ पुणें जिल्ह्यातील खेड तालुक्यातील, कान्हेवाडीबुद्रक. पाळू. कोरेगांव व आणखी दुसरे थोडे इनाम गांव यांच्या इनामदारांकडून व गावकऱ्याकडून हक्क नोंदणी करतां यावी म्हणून केलेल्या मोजणीचा खर्च वसूल करण्याचा हुकूम कां झाला याची माहिती सरकार देईल कां?

ब खातेदार या नात्यानें इनामदार व गावकरी यांच्या विचाराखेरीज मोजणीचें काम चालू केलें ना?

**ऑनरेबल मि. सी. व्ही. मेहता.**

अ. प्रश्नांत असलेले गांव मोजणी न झालेले इनाम गांव आहेत. हक्क नोंदणीच्या कामाकरतां सरकारच्या हुकुमानें या गावच्या मोजणीचें काम हातीं घेण्यांत आलें. मोजणीचा खर्च जमिनमहसूलाच्या कायद्याच्या कलमाप्रमाणें वसूल करण्यांत आला.

(ब) होय. असल्या कामीं इनामदाराच्या अगर गावकऱ्याच्या संमतीची जरूरी नसते. तथापि होणाऱ्या मोजणीची सर्व साधारण नोटिस असल्या प्रत्येक गांवीं मोजणी सुरू होण्याच्या पूर्वीं गावच्या चावडींत लाविली आहे.

[ सरदार. जी. एन्. मुजुमदार. असल्या मोजणीचे खर्चाची रक्कम गावकऱ्याकडून कोणत्या कायद्या अन्वयें अगर अधिकारानें मागितली आहे ही माहिती मला पाहिजे आहे

**ऑनरेबल मि. सी. व्ही मेहता** जमिन महसूलाच्या कायद्याचे आधारानें.

स. मुजुमदार—कोणतें कलम

**ऑनरेबल मि. सी. व्ही मेहता.** सन्मान्य सभासदास एकदम उत्तर मला देतां यत नाहीं.

## फारेस्ट डिमार्केशन हद्दींत झाडें तोडणें.

**मि. ना. रा. गुंजाळ.**

अ. फारेस्ट डिमार्केशन हद्दींत, त्या हद्दींतील साग व रायवळ झाडें तोडण्याबद्दल जमिनीच्या मालकाचे काय हक्क आहेत याची माहिती सरकार देईल कां ?

ब. पुणें जिल्ह्यातील हवेली तालुक्ययातील गोन्हेबुद्रुक गावची मथुबाई ऊर्फ रमाबाई सुदामे यांस आपली जमीन सर्वे नंबर २३ व २४ यातील साग व दुसरीं झाडें तोडण्याची परवानगी मध्यभाग कन्सरवेटर ऑफ फारेस्ट यांनीं नाकारली ही गोष्ट खरी आहे का हें सरकार सांगेल का ?

**मि. ए. एम्. के. देहलवी.**

अ. जमिन महसूलाच्या कायद्याचें कमम २१४ या खालीं झाले नियमापैकीं नियम ६३ ( १ ) यांत सांगितलें कीं, फारेस्टच्या पंजूर झालेल्या डिमार्केशन हद्दींतील सर्व जमिनी घेण्याचें काम पुरे होईपर्यंत पुणें जिल्ह्यातील तालुका जुन्नर, हवेली व पुरंदर व पेटा आंबेगांव यांत जमिन धारण करणारास सागाचीं झाडें किंवा त्यांचा फुटवा यावर कोणतीही मालकी नाहीं. आणखी असेंही सांगितलें आहे कीं या जमिनीतील ज्या झाडावरील हक्क सरकारनें राखून ठेवले आहेत अशीं झाडें, कलेक्टरच्या विचारानें फारेस्ट खात्याकडून अगर त्यांच्या हुकुमा अन्वयें वेळोवेळीं तोड होण्यास पात्र असतील.

ब. होय.

[ **मि. आर. जी. सोमण.** सदरहु मथुबाई यांस परवानगी दिली नाहीं याचें कारण मला कळेल का ? ]

**मि. ए. एम्. के. देहलवी.** मी हें काम पाहिलें नाहीं मला त्याची सूचना पाहिजे.

## १९२३ मुंबई लोकलबोर्ड अॅक्टावरील नियम

**मि. ना. रा. गुजाळ.**

अ. मुंबई लोकलबोर्ड अॅक्ट १९२३ याच्या कलम १३३ या खालील नियम सरकारनें अखेर मंजूर केले का याची हकिकत सरकार सांगेल का ?

ब. पुणें जिल्ह्यातील तालुका व जिल्हा लोकलबोर्डांच्या मतदारांच्या याद्या कधीं प्रसिद्ध होण्याचा संभव आहे ?

क. या याद्या प्रसिद्ध करण्याचा खर्च संबंध असणाऱ्या लोकलबोर्डाकडून वसूल करून घेण्याचा आहे का ?

ड. सन १९२३ च्या नवीन कायद्याप्रमाणें तालुका व जिल्हा लोकलबोर्ड कधीं स्थापन होणार याची अंदाजी तारीख कोणती आहे ?

**ऑनरेबल** मि. खा. ब. शेख गुलामहुसेन.

अ. कलम १३३ याच्या रकमा ब. क. ड आणि ग या खालील नियम अखेरचे प्रसिद्ध केले आहेत. उत्तरभाग व मध्यभाग यांच्या पुरतें रकम अ खालील व रकम ई खालील नियम तात्पुरते प्रसिद्ध केले आहेत. रकम फ व रकम ह या खालील नियमांचा विचार चालू आहे.

ब. मुंबई लोकलबोर्ड अॅक्टाचें कलम १२ ( २ ) प्रमाणें मतदारांच्या याद्या निवडणुकीची तारीख ठरण्यापूर्वी तीन महिने प्रसिद्ध केल्या जातील. मध्यभागांतील लोकलबोर्डांच्या पुनर्रचनेची तात्पुरती तारीख १ दिसेंबर १९२४ ठरविली आहे.

क. होय.

ड १ दिसेंबर १९२४.

## पुणें जिल्ह्यांतील फारेस्टांतली जमीन.

**मि. ना. रा. गुंजाळ.**

अ. फारेस्ट डिमार्केशनच्या हद्दींतील कांहीं जमिनीबद्दल पुणें जिल्ह्यांतून सरकारकडे कांहीं तक्रारी आल्या आहेत का ?

ब. फारेस्ट डिमार्केशन हद्दींतील सागाच्या व इतर झाडाच्या सरकार स्वामित्वाची आकारलेली रकम इतर ठिकाणीं असलेल्या रकमेपेक्षां जास्त असते कां ?

क. डिमार्केशन हद्दींतील सागाच्या व इतर झाडांच्या दुसऱ्या वाढीचा मालक कोण यासंबंधीं कांहीं नियम आहे कां ? जर असेल तर तो नियम कोणता ?

ड. जर त्या नियमाप्रमाणें दुसऱ्या वाढीचा मालक सरकार असेल तर जमिनीच्या मालकास, दुसरी वाढ फुटल्यावर त्या जमिनींत आपलीं गुरें चारू देतात कां ?

**ऑनरेबल मि. ए. एम्. के. देहलवी** अ. होय.

ब. होय. सागाच्या झाडाच्याच पुरता विचार केला तर, पुणें सातारा व अहमदनगर जिल्ह्यांतील कांहीं तालुक्यांत डिमार्केशन हद्दींत असणाऱ्या सागाच्या झाडाबद्दल सरकार स्वामित्वाची रकम १ रुपया होती ती १½ वाढविली आहे. दुसऱ्या झाडाबद्दलच्या दरांत फेरफार केला गेला नाहीं.

क. जमीन महसुलाच्या कायद्याच्या २१४ कलमाखालील केलेल्या नियमापैकीं नियम ६३ सन्माननीय सभासदानें पहावा. राखून ठेवलेल्या झाडांच्या पुढील फुटी कोणत्या जमिनींत सरकारच्या आहेत हें त्या नियमांत सांगितलें आहे.

## ओतूर सबरजिस्टारची कचेरी.

**मि. ना. रा. गुंजाळ.**

पुणें जिल्ह्यांतील जुन्नर तालुक्यांतील ओतूरची सबरजिस्टर कचेरी काय कारणानें बंद केली हें सरकार सांगेल कां ?

मि. ए. एम् के. देहलवी. प्रश्न विचारलेली कचेरी, तेथें होत असलेल्या कामाच्या मानानें ठेवणें वाजवी नसल्यामुळें बंद करण्यांत आली. या डिस्ट्रिक्टांतील गांवें जुन्नर व नारायणगांव सबडिस्ट्रिक्टांत, लोकांस कमीतकमी त्रास पडावा या दृष्टीनें, वाटून दिलीं आहेत.

## गुन्हेगार जातीच्या वसाहतींत वसाहत करणाऱ्यांस नीतीचे धर्माचें शिक्षण.

**मि. ना. रा. गुंजाळ.**

या इलाख्यांतील गुन्हेगार जातींच्या वसाहतींत नीतीचे व धर्माचे शिक्षण देण्याची काय व्यवस्था सरकारानें केली आहे याची पूर्ण माहिती सरकार देईल कां ?

**ऑनरेबल सर मॉरिस हेवर्ड.** दिवसाच्या व रात्रीच्या शाळांतून गोष्टींच्या रूपानें व अप्रत्यक्षपणें बॉयस्काऊट व गर्लगाईड संस्थामार्फत नीतीचें शिक्षण दिलें जातें.

वसाहतींतील रहिवाशांस पूर्ण धार्मिक स्वतंत्रता दिली जाते व आपण होऊन कोणास शिकविण्याची इच्छा असेल त्यास तेथें जाऊं दिलें जातें.

[ मि. मौलवी रफीउद्दीन अहमद:-वसाहतींतील सर्व रहिवाशांस बायबलाचें वाचन व शिक्षण दिलें जातें ही गोष्ट खरी आहे काय ?

आनरेबल सर मॉरिस हेवर्ड—मला वाटतें कीं, हें खरें नाहीं. नक्की उत्तर सन्माननीय सभासदास हवें असेल तर मला सूचना पाहिजे.

## पुणें येथील नॉनग्याझिटेड नोकरांस घरभाडें वगैरे.

**मि. ना. रा. गुंजाळ.**

पुण्यास नोकरीवर असलेले फारेस्ट व दुसऱ्या खात्यांतील नॉन ग्याझिटेट कामगाराकडून सरकारकडे कामपेनसेटरी अलावन्स मिळण्याबद्दल कांहीं विनंति अर्ज आले आहेत कां ! ही माहिती सरकार देईल कां !

( ब ) आले असल्यास त्यांची काय तजवीज केली !

**ऑनरेबल मि. एच्. एम्. लॉरेन्स.**

अ. आणि ब. सन्माननीय सभासदानें विचारलेल्या प्रश्नास तारीख १३ आक्टोबर १९२४ रोजीं दिलेलें उत्तर पहावें.

## अध्यक्षाच्या पगाराचें बिल.

**मि. ना. रा. गुंजाळ.** ( मराठींत भाषण ) प्रेसिडेंटच्या पगाराच्या बिलासंबंधाची, स्वराज्य पार्टीचे पुढारी सन्मान्य सभासद महाराज, मि. जयकर यांनीं आणलेली उपसूचना या कौन्सिलनें फार विचार करण्याजोगी आहे असें मला वाटतें. जरी या सन्मान्य सभेचा हल्लींचा अध्यक्ष सरकारनियुक्त आहे तरी या कौन्सिलास आपला अध्यक्ष फार लवकरच निवडावा लागेल. महाराज, लोकांच्या प्रतिनिधींचें मुंबईसारख्या कायदेकौन्सिलच्या लोकनियुक्त अध्यक्षाचा दर्जा वाढविणें व त्याचा दर्जा कोणत्याही तऱ्हेनें कमी न होऊं दिलेला पहाणें हें कर्तव्य आहे. युरोपिअन अध्यक्ष असतां तर त्याचा पगार कमी करण्याच्या एखाद्या आणलेल्या उपसूचनेस मी मनापासून पाठिंबा दिला असता. यांत स्वाभिमानाचा प्रश्न येतो. त्याचा विचार करून सन्माननीय सभासद मि. जयकर यांनीं आणलेली उपसूचना सर्व पक्षाचे सन्माननिय समासद या सभेंत जमले आहेत ते एकमतानें मंजूर करतील अशी मला आशा आहे. अशी आशा प्रदर्शित करून सन्माननीय सभासद मि. जयकर यांनीं आणलेल्या उपसूचनेस मी मनापासून दुजोरा देतों.

## आनरेबल सर इब्राहीम रहिमतुल्ला अध्यक्ष यांच्या कामगिरीवर ठराव.

**मि. ना. रा. गुंजाळ.** ( मराठींत भाषण ) माझे सन्माननीय मित्र मि. सुर्वे यांनीं आणलेल्या ठरावास मी मनापासून पाठिंबा देतों. आपल्या अध्यक्षांच्या ध्यानांत ठेवण्याजोग्या एका विशेष गोष्टीचा या प्रसंगीं मी उल्लेख करतों. ती अशीं कीं, आमच्यापैकीं कांहीं जणास आपल्या स्वतःच्या देशी भाषेंत कौन्सिलांत भाषण करूं देण्यास परवानगी देत असत व असें करण्यांत त्यांस फार आनंद वाटत असे. या कौन्सिलांतील त्यांच्या कामासं-

बंधानें, या इलाख्यांतील निरनिराळया प्रांतांचे प्रतिनिधी असलेल्या कित्येक सन्मान्य सभासदांनीं गुणवर्णनपर उल्लेख पूर्वींच केला आहे व त्याविषयीं कांहीं सांगण्याची गरज मला उरलेली नाहीं; परंतु त्या सर्वांनीं सभेंत इंग्रजी भाषण केलें असल्यानें महाराष्ट्रीय या नात्यानें महाराष्ट्रांत अथवा मराठी भाषेंत सभेंत बोलण्यास मी उभा आहे. ज्यास इंग्रजी येत नाहीं त्यांची अशी बळकट इच्छा आहे कीं या कौन्सिलांत मराठी भाषेंत म्हणजे महाराष्ट्राच्या भाषेंत काम चालावें. असा एकादा दिवस येईल व अशा अंतिम हेतूस हल्लींचे अध्यक्ष आम्हांस मनापासून उत्तेजन देतील. ईश्वरी इच्छेनें आमचे पुढील अध्यक्षही सन्माननीय सर इब्राहिम हे लाभतील अशी इच्छा बाळगून मी आपलें भाषण संपवितों.

## कऱ्हा नदींचें धरण.

**मि. ना. रा. गुंजाळ** अ. जेजुरी, मावडी जोगवडी व दुसरीं गांवें यास कऱ्हा नदीला धरण बांधून कालव्याचें पाणी पुरवठा करण्याची कांहीं योजना सरकारपुढें होती कां ?

( ब ) जर असेल तर त्या कामाचा तपशील काय आहे ? व त्यासंबंधानें सरकारचा ठराव काय झाला आहे ?

**आनरेबल मि. कावसजी जहांगीर** सन १९०९ सालीं तीस लाख रुपये खर्चाचें एक कच्चे अंदाजपत्रक नाजरा येथें कऱ्हा नदीवर तलाव करण्याकरतां तयार झालें होतें.

पुढील गांवें, परंतु जेजुरी नव्हे, या कामाच्या आटोक्याच्या क्षेत्रांत येतात. ( १ ) नाजरेबुद्रुक. ( २ ) जमळार्जुन ( ३ ) मावरी ( प्रश्नांत सांगितल्याप्रमाणें मावडी नव्हे ). ( ४ ) जोगवरी ( ५ ) अंबी बुद्रुक ( ६ ) मोरगाव ( ७ ) तुर्डली.

व या कामाचे फक्त कच्चे नकाशे व अंदाजपत्रक तयार केलें होतें व जर जरूर उत्पन्न झाली व जिल्ह्यांतील कामानें सवड झाली तर दुष्काळ काम म्हणून या कामाचा पुढें विचार व्हावा असें ठरलें होतें.

[ मि. देव. फक्त अक्षराची दुरुस्ती आहे अगर मावरी व मावडी अशी निराळीं गांवें आहेत. आनरेबल मि. कावसजी जहांगीर—अक्षरांची

ही दुरुस्ती आहे असें मला वाटतें. परंतु मला याची सूचना पाहिजे. एकदम मला याचें उत्तर देतां येत नाहीं. ]

## फिरतीवरील कामगारांच्या फिरती.

**मि. ना. रा. गुंजाळ.** फिरतीवरील कामगार व विशेषतः मॅजिस्ट्रेट जनतेस आपला फिरतीचा कार्यक्रम कळवीत नसल्यानें गैरसोय होते. याची जाणीव सरकारास आहे का ? याची माहिती सरकार देईल का? असल्यास या कामीं कांहीं तजवीज करण्याचा त्यांचा विचार आहे कां ?

**ऑनरेबल सर मारिस हेवर्डः** फिरती कामगारांनीं फिरतीचा कार्यक्रम स्थानिक वर्तमानपत्रकर्त्यास पुरवावा याविषयीं सरकारनीं पूर्वींच हुकूम दिलेले आहेत. तथापि फिरती कामगाराच्या हालचाली सरकारच्या नोकरीच्या जरुरीप्रमाणें असावयास पाहिजेत हा मुख्य विचार आहे व म्हणून नोटिस दिल्याखेरीज असे कार्यक्रम बदलावे लागतील. हायकोर्टाचे क्रिमिनल सर्क्युलर मधील भाग ३ यांतील सर्क्युलर नंबर ३७ प्रमाणें मॅजिस्ट्रेट यांस याविषयीं विशेष हुकूम दिलेले आहेत.

[ मि. डी. आर पाटील मॅजिस्टेटांनीं. मुख्य ठिकाणीं शक्य तितके करून खटले घ्यावे असें त्यास फर्मावण्याचें सर्क्युलर सरकारनें काढलें आहे ही गोष्ट खरी आहे का ?

**ऑनरेबल सर मारिस हेवर्ड.** असें मला वाटतें; परंतु पक्की खातरी होण्याकरितां मला नोटिस पाहिजे. ]

## इंद्रायणीवरील नावेचा कर.

**मि. ना. रा. गुंजाळ.** अ. पुणें जिल्ह्यांतील हवेली व खेड तालुक्याच्या हद्दीमधील मोशीजवळील इंद्रायणी नदीवर असणाऱ्या नावेचा कंत्राटदार मोटारीतून येणाऱ्या उतारूपासून अशा मोटारीवर कर घेऊनही आणखी नावउतार घेतो. ही गोष्ट सरकारास ठाऊक आहे का याची माहिती सरकार देईल का ?

( ब ) जर असे असेल तर कांहीं तजवीज करण्याचा सरकारचा विचार आहे का ?

**ऑनरेबल मि. हिदायतल्ला.** माहिती मागविली आहे.

**ऑनरेबल मि. हिदायतल्ला.** होय. नावेच्या कंत्राटदारास त्याच्या कंत्राटाच्या शर्तीप्रमाणें मोटार गाडींतून प्रवास करणाऱ्या उतारूपासून मोटारगाडी वरील कराखेरीज तो कर फक्त मोटारगाडी नदीपलीकडे नेण्याचा असल्यानें नावउतार निराळा घेण्याचा हक्क आहे.

ब. नाहीं.

## पुणें जिल्ह्यांतील गांवपाटील व गांवकरी यांस बंदुका तरवारी.

**मि. ना. रा. गुंजाळ.** खेडे गांवच्या लोकांस व त्यांच्या पिकांस लुटारू लोक व रानटी जनावरें यांजकडून, बंदुकींचे परवाने त्यांच्याजवळ पुरेसे नसल्यामुळें, जो त्रास पोचतो त्याची जाणीव सरकारास आहे का याची माहिती सरकार देईल का?

व जर असेल तर त्या बाबतींत कांहीं तजवीज करण्याचा सरकारचा विचार आहे कां ?

**आनरेबल सर मारिस हेवर्ड.** सरकारकडे याविषयींकांहीं तक्रारी आल्या नाहींत; खेडेगावातील प्राण व पिके यांच्या रक्षणांकरितां परवाने देण्याच्या कामीं डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट यांस सारासार विचाराचे पूर्ण अधिकार दिलेले असतात व त्यांच्या नजरेस एकादे संकट किंवा अडचणी आणल्यास त्यांचा निकाल लावण्यास ते समर्थ असतात.

## सरकारी अधिकारी व नोकर लोक यांनीं दस्तुऱ्या देण्याबद्दल माफी.

**मि. ना. रा. गुंजाळ** अ सरकारी अधिकारी व नोकर हे कामावर असतांना प्रांतिक व लोकलबोर्ड रस्त्यावरील दस्तुरी देण्याची त्यांस माफी असते का ?

ब या कौन्सिलचे सभासद व लोकलबोर्डांचे सभासद अधिकारी व नोकर हे कामावर असतांना अशा रस्त्यावरील दस्तुरी देण्याची त्यांना माफी असते का ? याचा खुलासा सरकार करील काय ?

**आनरेबल खानबहादुर शेख गुलाम हुसेन** अ. होय.

ब लेजिस्लेटिव्ह कौन्सिलच्या सभासदांस, प्रांतिक व लोकलबोर्ड रस्त्यावर दस्तुरी देण्याची माफी नाहीं. लोकलबोर्डाचे अधिकारी व सभासद यास माफी नाहीं; परंतु त्यांच्या भत्तेबिलांत दस्तुरीबद्दलची रकम बोर्डाकडून मागण्याची त्यास परवानगी आहे. तथापि लोकलफंड ओव्हरसियर व दुसरे नोकर यांस ज्या रस्त्यावर दस्तुऱ्या बसविलेल्या असतात त्या रस्त्यासंबंधानें ते कामगिरीवर प्रवास करीत असतील त्यावेळीं मात्र दस्तुऱ्या देण्याची त्यांस माफी आहे.

## न्याय खात्यांतील कारकुनास पगाराची आगाऊ वाढ.

**मि. ना. रा. गुंजाळ.** अ शाळाखातें,मुलकी खातें, न्यायखातें रजिस्ट्रेशन, फारेस्ट, अबकारी, पोलिस इंजनेर व सार्वजनिक नोकरीची आणखी इतर मुख्य खातीं यांतील खालच्या तांबे नोकरांच्या पगाराची निरनिराळीं प्रमाणें कोणत्या तारखेपासून सुधारली. त्या तारखा सरकार देईल का? व त्याच वेळीं प्रत्येक खात्यांत सुधारणा कितपत केल्या हेहीं कळवील का ?

ब. न्याय खात्यांखेरीज इतर खात्यांतील ज्या कारकुनांचा प्रारंभीचा पगार सन १९१४किंवा त्यापूर्वी रुपये वीस होता, त्या कारकुनास सन १९१४ ते १९२० पर्यंतची अगाऊ वाढ दिली गेली. आणि न्यायखात्यांतील कारकुनांस सारख्याच मुदतीची नोकरी व तितकीच लायकी असतांना, सन १९१८ पर्यंत त्यांस कमी पगार मिळत होता या मुद्यावर अशी आगाऊ वाढ मिळली नाहीं. याची जाणीव सरकारास आहे का? ही माहिती सरकार देईल का?

क. जर असें असेल तर या बाबतींत कांहीं तजवीज करण्याचा सरकारचा विचार आहे का याचा खुलासा सरकार करील का ?

**ऑनरेबल सर मॉरिस हेवर्ड** अ.हिशेबी खात्याचा सन्माननीय मेंबराकडे माहिती मागवावी.

ब. दक्षिणेंतील सरदार व इनामदार यांच्या सन्माननीय सभासदांस १४ आक्टोबर १९२४ रोजीं उत्तरें दिलीं आहेत तीं पहावीत.

उत्तरें दिलीं तीं. [ सरदार जी. एस्. मुजुमदार. यांचे प्रश्नास आनरेबल सर मारिस हेवर्ड यांचें उत्तर.

अ. होय.

ब. नाहीं.

क. हिशोबी खात्यांनीं फेरतपासणीच्या वेळीं पगाराचा दर प्रारंभीचा कसा योजावा या कामीं केलेल्या नियमानुसार अगदीं कडक रीतीनें अमलबजावणी झाली आहे.

## तळेगांव व मनचर यामधील रेल्वे.

**मि. ना. रा. गुंजाळ.** अ. पुणें जिल्ह्यांतील तळेगांवपासून मनचर पर्यंत रेलवे लाइन करण्याच्या एखाद्या योजनेची सरकारास माहिती आहे का ? ही माहिती सरकार देईल का ?

ब. अशी रेलवेलाईन करण्याबद्दल मेसर्स भाटवडेकर आणि पुराणीक या नांवच्या इसमांस परवानगी दिली आहे ही गोष्ट खरी आहे का ?

क. असें असल्यास या योजनेप्रमाणें काम कोठवर झालें आहे ?

**आनरेबल मि. मेथा.** अ होय.

ब. नाहीं. मेसर्स फाटक खांडगे आणि भाटवडेकर यांस. उत्पादक म्हणून " रोड रेल पद्धतीप्रमाणें लायनीची मोजणी करण्यास परवानगी दिली आहे.

क उत्पादक कळवितात कीं या लायनीची मोजणी संपली आहे. नकाशा अंदाजपत्रक व रिपोर्टाची वाट पहात आहोंत.

## प्राथमिक शाळेंत इंग्रजी.

**मि. ना. रा. गुंजाळ.** पुणे जिल्ह्यांतील कोणत्या प्राथमिक शाळेंत पांचव्या सहाव्या व सातव्या यत्तेतील मुलांस व मुलीस सरकारी ठराव नंबर ६०५ तारिख १२ जून १९२२ शाळाखातें, याप्रमाणें इंग्रजी शिकाविलें जातें ? याची माहिती सरकार देईल का ?

**आनरेबल मि. जाधव.**

उत्तर—कोणत्याही नाहीं.

**मि. एन्. इ. नवले.** पुणे जिल्ह्यांत अशा पद्धतीच्या शाळांस वाढ करण्याची जरूरी नाहीं का ?

**ऑनरेबल मि. बी. व्ही. जाधव.** सुरू केलेल्या शाळा प्रयोगादाखल आहेत व प्रयोग यशस्वी झाल्यावर नवीन शाळा सुरू करण्याचा सरकार विचार करील.

**मि. एच. बी. शिवदासानी.** प्रयोग यशस्वी आहे किंवा नाहीं हें सरकारास केव्हां कळेल ?

उत्तर नाहीं.

## देशी यत्तामध्यें इंग्रजी शिकवणें.

**मि. ना. रा. गुंजाळ.** सरकार ठराव नंबर ६०५ तारीख १२ जून १९२२ व १ जुलई १९२३ शाळाखातें याप्रमाणें पुणें जिल्ह्यांत पूर्ण सातयत्ता चालणाऱ्या शाळांतील मुलांस व मुलींस इंग्रजी शिकविण्याकरतां त्यांनीं कां तजविजी केल्या नाहींत यांचीं कारणें सरकार मेहरबानीनें सांगेल का ?

**ऑनरेबल मि. बी. व्ही. जाधव.** पहिल्या ग्रेडच्या प्राथमिक शाळांच्या पांच सहा व सात यत्तांस इंग्रजी क्लास जोडण्याचें काम सिंधप्रांतसुद्धां सर्व इलाख्यांत निवडक वीस जागीं प्रयोगादाखल सुरू केलें. सरकारास या प्रयोगाची वाढ कां करतां येत नाहीं याची माहिती सरकारनें प्रेस नोट नंबर ६०५ तारीख १ सपटेंबर १९२३ मध्यें सविस्तर दिली आहे, तिजकडे सन्माननीय सभासदानें लक्ष पुरवावें.

**मि. मौलवी रफीउद्दीन अहमद.** उर्दु प्राथमिक शाळांत अशा वर्गाची फार जरूरी आहे याची माहिती सन्माननीय प्रधानास आहे का आणि जर असेल तर ही गरज पुरी करण्याचा विचार चालू आहे का ?

**ऑनरेबल मि. बी. व्ही. जाधव.** ही गोष्ट माझ्या नजरेस आणलेली नाहीं.

**मि. ना. रा. गुंजाळ** यांचे प्रश्नावरून दिलेली माहिती.

एल्. सी. पी. आणि एस् परीक्षेचे निकाल.

| | परीक्षेस बसले | पास झाले | शेंकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| मे १९२० | १४७ | ७४ | ५० |
| नवंबर १९२० | २४८ | १०४ | ४६ |
| मे १९२१ | १७२ | ८५ | ४९ |
| नवंबर १९२१ | २३८ | ९५ | ३५ |
| मे १९२२ | १४७ | ६१ | ४३ |
| नवंबर १९२२ | १५७ | ७२ | ४५ |
| मे १९२३ | २०९ | ६९ | ३३ |
| नवंबर १९२३ | १६१ | ४३ | २७ |
| मे १९२४ | १८४ | ३९ | २१ |

**ऑनरेबल मि. बी. व्ही. जाधव.**

वैद्यकीय शाळांचे सुपरिंटेंडेंटांस यापूर्वीच विनंति केली आहे कीं बाहेर गांवचे शिक्षकांना परीक्षक म्हणून अर्ज करण्यास उत्तेजन द्यावें.

नेमलेल्या अभ्यासक्रमास गचाळ विद्यार्थ्यांस भाग पाडावें. या घेण्याजोग्या गोष्टींचा विचार चालू आहे. पुणे व अहमदाबाद येथें ज्यास्ती सोयी पुरवण्यासंबंधानेंही विचार चालू आहे.

मागितलेली आकड्यांची माहिती दाखविणारा तक्ता जोडला आहे.

## एल्. सी. पी. आणि एस्. परीक्षा.

**मि. ना. रा. गुंजाळ.** एल्. सी. पी. आणि एस्च्या अखेरच्या परिक्षेंत पास होणाऱ्या विद्यार्थ्यांचें शेंकडा प्रमाण कमी होत आहे याची चौकशी सरकारनें केली आहे का ? याची माहिती सरकार देईल का ?

**ऑनरेबल मि. जाधव.** चौकशी चालू आहे. माहिती चवथे सेशनाच्या पहिल्या लिस्टाच्या प्रश्न नंबर २ च्या उत्तरांत आली ती. होय. मि. गुंजाळ यांनीं, मि. ल. ब. भोपटकर (पुणे शहर) यांनीं विचारलेल्या नं. २१ च्या प्रश्नास दिलेलें उत्तर पहावें.

## राज्यकारभाराच्या वार्षिक रिपोर्टांची विक्री.

**मि. ना. रा. गुंजाळ.** अ. राज्यकारभाराचे सरकारच्या सर्व खात्यांचे वार्षिक रिपोर्ट लोकांस विकत मिळण्यास ठेविले आहेत का याची माहिती सरकार देईल का ?

ब. जर कांहीं अपवाद असेल तर अशा अपवाद करण्यास काय कारणें आहेत. व संबंध असणाऱ्या खात्यांचीं नांवें काय आहेत ही माहिती सरकार देईल का ?

क. डायरेक्टर ऑफ इन्फर्मेशन यांचे गेल्या तीन सालचे वार्षिक रिपोर्ट कौन्सिलचे टेबलावर सरकार ठेवील काय ?

**ऑनरेबल मि. कावसजी जहांगीर.** अ. माहिती मिळविली जात आहे. माहिती चवथें सेशनच्या चवथ्या लिस्टच्या प्रश्न पहिल्याच्या उत्तरीं मिळाली ती.

ब. मुळींच नाहीं.

क. सोबतच्या यादींत सांगितलेले रिपोर्ट लोकांस विकीत नाहींत कारण ते आफिसच्या उपयोगाकरितां प्रसिद्ध केलेले असतात.

## अपेंडिक्स ३५ चा उतारा.

१ एडनचा वार्षिक ॲडमिनिस्ट्रेशन रिपोर्ट.

२ मुंबई कलेक्टरेटचा ,,

३ मुंबईइलाख्याचा इरिगेशन रेव्हिन्यु रिपोर्ट.

४ मुंबई प्रॉव्हिन्शिअल अड्व्हिसरी कमिटीचा वार्षिक रिपोर्ट.

५ पब्लिक वर्क्स खात्याचा मुंबई इलाख्याचा ॲड्मिनिस्ट्रेशन रिपोर्ट भाग १.

६ इरिगेशनकरतां पाणी पुरवठा व कॅचमेंट एरियामधून पाणी किती जातें याचा वार्षिक रिपोर्ट. मुंबई इलाखा.

७ गवर्नमेंट फोटो झिंको प्रेस पुणे, वार्षिक रिपोर्ट.

८ एडन मीठ खात्याचा वार्षिक ॲड्मिनिस्ट्रेशन रिपोर्ट.

नोट १ मुंबई गवर्नमेंटच्या ताब्यांतील पोलिटिकल एजन्सीचे रिपोर्ट

लोकांस विकीत नाहींत कारण ते आफिसच्याच उपयोगाकरतां केलेले असतात.

२ हे वार्षिक रिपोर्ट आफिसच्या उपयोगाकरतां केलेले असतात व लोकांस विकण्याकरतां केलेले नसतात.

## डिट्रिक्ट लोकलबोर्ड व म्युनिसिपालिट्या यांत आयुर्वेदिक दवाखाने.

**मि. ना. रा. गुंजाळ.** अ. रावबहादूर काळे यांनीं आक्टोबर १९२१ मध्यें याविषयावर ठराव आणल्यापासून स्थानिक औषधांच्या प्रश्नाची चौकशी करण्याकरतां एका आय्. एम्. एस्. आफिसराची सरकारनें नेमणूक केली आहे का याची माहिती सरकार देईल का ? व असे असेल तर अशा चौकशीचे परिणाम काय झाले ?

**ऑनरेबल मि. बी. व्ही. जाधव.** पुणें जिल्ह्याचे सभासदानें ( पुणें शहराचे ) मि. ल. ब. भोपटकर यांनीं विचारलेल्या नं. १ च्या १५ आक्टोबर १९२४ च्या प्रश्नास दिलेलें उत्तर पहावें.

**ऑनरेबल मि. बी. व्ही. जाधव.** १९२१ सालांत सातारा जिल्हा लोकलबोर्डानें आपल्या खर्चातून एक आयुर्वेदिक दवाखाना सुरू करण्यास व चालू ठेवण्यास सरकारची परवानगी मागितली. परवानगी दिली गेली व त्यासंस्थेस त्याचवेळीं कळविण्यांत आलें होतें कीं असा दवाखाना कांहीं दिवस चालल्यावर व त्याच्या उपयुक्ततेबद्दल अनुभव आल्यावर अशा दवाखान्यास सरकारची मदत मिळण्याच्या त्यांच्या अर्जाचा सरकार विचार करील. त्याचप्रमाणें अहमदनगरच्या जिल्हा लोकलबोर्डानें आपल्या पैशांतून 'आयुर्वेदिक विद्यालय इन्स्टिटयूशन' यासंस्थेस वार्षिक रुपये २०० प्रमाणें तीनवर्षेपर्यंत दिलेली रक्कम त्याचवर्षी सरकारानें मंजूर केली. स्थानिक संस्थाकडून युनानी अगर आयुर्वेदिक दवाखाने स्थापण्यास मदत मिळण्याबद्दल आलेल्या अर्जांचा विचार करण्यास सरकार तयार आहे. इतर प्रांतांतील सरकाराकडे कांहीं चौकशी केली नाहीं.

## मुंबई बी. ई. स माफी.

**मि. ना. रा. गुंजाळ.**

मुंबई युनिव्हर्सिटीच्या बी. इ. पदवीधरांस, इन्स्टिटयूट ऑफ सिव्हिल एंजिनीअर्स, लंडनच्या असोसिएटेड मेंबरशिपच्या परीक्षेच्या A व B विभागांत पास होण्याची माफी, साम्राज्याच्या कांहीं युनिव्हर्सिट्यांस दिलेल्या माफीप्रमाणें दिली जात नाहीं. याची जाणीव सरकारास आहे का ही माहिती सरकार देईल का ?

**ऑनरेबल मि. बी. व्ही. जाधव**—होय.

## आयुर्वेदिक व युनानी औषधें.

**मि. ना. रा. गुंजाळ.** आयुर्वेदिक व युनानी औषधोपचाराच्या पद्धतीस उत्तेजन देण्याच्या प्रश्नाच्या बाबतींत सरकारचें कांहीं ठाम मत झालें आहे का याची माहिती सरकार देईल का ?

**ऑनरेबल. मि. जाधव.** पुणे जिल्ह्याच्या सभासदाचें ( पुणें शहरचे ) मि. ल. ब. भोपटकर यांनीं विचारलेल्या प्रश्न नंबर १ यास दिलेल्या ता. १५ आक्टोबर १९२४ च्या उत्तराकडे लक्ष जावें.

## गुरांचें संगोपन व रानटी जनावरें यांच्या कमिटीच्या शिफारशी.

**मि. ना. रा. गुंजाळ.** गुरांचें संगोपन व रानटी जनावरें यांच्या कमिटीनें केलेल्या प्रत्येक शिफारशीवर सरकारनें काय तजवीज केली याची माहिती सरकार सांगेल का ?

**ऑनरेबल मि. देहलवी.** सरकारचे हुकूम सरकारी ठराव नंबर ४०५८ तारीख ३१ जानेवारी १९२४ व नंबर ३२५२ तारीख ५ आगष्ट १९२४ यांत दाखल आहेत व त्यांच्या प्रति या कौन्सिलच्या सर्व बिनसरकारी सभासदांस पुरविल्या आहेत.

## पावसाच्या अपुरेपणावर उपाय.

**मि. ना. रा. गुंजाळ.** पुणें जिल्ह्याच्या पूर्व व इतर भागांतील पावसाची स्थिति पहातां पुढील माहिती सरकार देईल का ?

अ जमीनमहसुलाच्या कांहीं भागाची तहकुबी देण्याचा सरकारचा विचार आहे का ? असल्यास प्रत्येक तालुक्यास किती रकमा ?

ब. वरील तालुक्यांपैकीं प्रत्येकास तगाईची किती रक्कम देण्याचा सरकारचा विचार आहे ?

क. संकटांत पडलेल्या गुरांचें रक्षण करण्याचे कांहीं उपाय करण्याचा सरकारचा विचार आहे का व असें असेल तर कोणते उपाय योजणेचा त्यांचा विचार आहे ?

**ऑनरेबल मि. मेथा.** माहिती मागविली आहे. *( माहिती चवथे सेशनच्या दुसरे लिस्टांत प्रश्न १ चे उत्तरामध्यें आहे ) नुकतेच चांगले पाऊस झाल्यानें संकटाच्या उपायांची जरूरी नाहीं.

## खेडतालुक्यांतील गायरान.

**मि. ना. रा. गुंजाळ.**

पुणे जिल्ह्यांतील खेडतालुक्यांतील किती गांवास, दर एकरास २ गुरें या प्रमाणानें गांवच्या गुरांस गायरान नाहीं त्या गांवांची संख्या सरकार देईल का ?

**ऑनरेबल मि. देहलवी** ५७

**मि. जी. एम्. काळभोर.** मागील चांगल्या पावसापासून कांहीं संकटें आलीं याची सरकारास माहिती आहे का ?

**ऑनरेबल मि. मेथा.** मागून पडलेल्या पावसामुळें कांहीं अपाय घडल्याची सरकारास माहिती नाहीं.

**मि. जी. एम्. काळभोर.** आपणास या विषयावर कांहीं माहिती देण्याची माझी तयारी आहे.

**ऑनरेबल मि. मेथा**:—सन्माननीय सभासदांचा आभारी होईन.

**मि० एल्. बी. भोपटकर.** उत्तर असें आहे कीं, मागाहून पडलेल्या चांगल्या पावसाकडे पाहतां दुष्काळी. कामांची जरूरी नाहीं. ही खाते ताब्यांत असणाऱ्या सन्माननीय सभासदांची माहिती आहे

अगर जिल्हा अधिकाऱ्यांकडून आलेल्या रिपोर्टांच्या आधारावर ही माहिती रचली आहे.

**ऑनरेबल प्रेसिडेंट.** सन्माननीय सभासदास असा प्रश्न विचारतां येत नाहीं. सरकार आपल्या स्वतःच्या अधिकारावर उत्तर देतें. तें सरकारचें उत्तर आहे व त्याबद्दल ते जबाबदार आहेत. त्याबद्दल कौन्सिलास त्यांना जबाबदार धरतां येईल.

**मि. एल्. बी. भोपटकर.** पुणे जिल्ह्याचे पूर्वभागांत पुरेसा पाऊस नव्हता ही गोष्ट खरी नाहीं का ?

**ऑनरेबल मि. मेथा.** सरकारच्या जबाबदार अधिकाऱ्यांनीं आम्हांस दिलेला सल्ला असा नाहीं.

## खेड गांवपंचायत निवडणूक.

**मि. ना रा. गुंजाळ.** अ. केसरी वर्तमानपत्राच्या तारीख २ सप्टेंबर १९२४ च्या अंकांत प्रसिद्ध झालेल्या खेड गांवपंचायतीच्या सभासदांच्या निवडणुकीसंबंधाच्या मजकुराकडे सरकारचे लक्ष गेलें आहे का ?

ब. पुणे जिल्ह्यांतील खेड तालुक्यांतील खेड येथील कांहीं रहिवाशांकडून वरील निवडणुकींत अव्यवस्था झाल्याबद्दलचे व पुन्हा निवडणुकीची विनंती करणारे तक्रारी अर्ज पुण्याचे कलेक्टरकडे आले आहेत का ?

क. आले असल्यास त्यांची काय तजवीज झाली अगर करण्याचा विचार आहे ?

**ऑनरेबल खान बहादूर गुलामहुसेन.** अ. नाहीं.

ब. व क. चौकशी चालू आहे.

ब. पुणे जिल्हाबोर्डाचे अध्यक्षामार्फत कलेक्टरकडे एक विनंतिअर्ज आला होता. या कामाची हकीकत थोडक्यांत खालीलप्रमाणें आहे.

गांवच्या हद्दींतून वाड्या काढून टाकाव्या असा खेड गांवपंचायतीनें ठराव मंजूर केल्यावरून पुणे जिल्हा बोर्डाचे अध्यक्षानें त्या पंचायतींतल्या सभासदांची संख्या लोकसंख्येच्या प्रमाणानें गांवपंचायत कायद्याचें कलम ४ अन्वये बोर्डानें पूर्वी मंजूर केलेल्या ठरावाप्रमाणें ११ ची ९ करावी असें सुचविलें. व गावपंचायतीच्या हद्दींत बदल झाल्यानें

लहान केलेल्या क्षेत्राकरतां नवीन मदतदारांची यादी करावी व नवीन निवडणुकी कराव्यात. ११ सभासदांपैकीं वाडीचा रहिवासी फक्त एक होता. व त्यास कलम ६ [क] प्रमाणें सभासद म्हणून राहतां येत नव्हतें व कलेक्टरनें ठरविलें कीं, गांवपंचायत कायद्याचें कलम १० प्रमाणें पूर्वींच निवडणूक झालेल्या सभासदांची कामाची मुदत तीन वर्षांची नेहमींप्रमाणें आहे. व पंचायत कायद्याच्या ३६ व्या कलमांत सांगितलेल्या कारणासाठींच फक्त रद्द करतां येते व तीं कारणें या कामीं नाहींत.

कायद्याचें कलम ४ प्रमाणें जरी ज्या सभासदांची पंचायत व्हावयाची त्यांची संख्या ठरविण्याचा अधिकार जरी जिल्हा बोर्डाकडे असला तरी, ज्या तीन वर्षांकरितां एकादी पंचायत निवडली गेली असेल. त्या तीन वर्षांच्या मुदतींत एकदां कायम केलेली सभासदांची संख्या फिरविण्याचा अधिकार त्या संस्थेस नाहीं. म्हणून कलेक्टरास आतां कळविलें आहे कीं, कायद्याचें कलम ६ [क] प्रमाणें अपात्र झालेल्या ११ व्या सभासदाची जागा भरावी.

## इनाम गांवची मोजणी.

**मि. ना. रा. गुंजाळ.** अ. पुणे जिल्ह्यांतील खेड तालुक्यांतील ज्या इनाम गांवांस अद्यापि प्रथम मोजणी लागू केली नाहीं अशांची नांवें सरकार मेहेरबानीनें देईल का ?

ब. अशा इनाम गांवच्या इनामदारांनीं आपल्या गांवांस तरम लागू करून घ्यावें म्हणून त्यांचें मन वळविण्याची कांहीं तजवीज सरकारनें केली आहे का ?

क. असें असेल तर आपल्या गांवास तरम लागू करून घेण्याच्या संबंधानें अशा इनामदारांनीं काय अडचणी पुढें आणल्या आहेत? व त्यांच्या अडचणी दूर करण्यासंबंधानें सरकारनें काय तजवीजी केल्या ?

**ऑनरेबल मि. मेथा.** माहिती मागविली आहे.

**ऑनरेबल मि. मेथा.** अ. (१)असखेड बुद्रुक (२) कोरेगांव खुर्द.

( ३ ) चिखलगांव. ( ४ ) तारेणे बुद्रुक. ( ५ ) पांगरी. ( ६ ) पाळू ( ७ ) भावडी. ( ८ ) सुरकुंडी. ( ९ ) कान्हेवाडी बुद्रुक. ( १० ) कान्हेवाडी खुर्द. ( ११ ) घोटवडी ( १२ ) डेहेणे. ( १३ ) विन्हाम.

ब. आपल्या इनाम गांवास मोजणी लागू करून घ्यावी म्हणून इनामदारांचें मन वळविण्याचें वेळोवेळीं शक्य ते प्रयत्न केले आहेत. परंतु कांहीं उपयोग झाला नाहीं.

क. मोजणीचें काम सुरू करण्याचें टाळण्याकरितां कांहीं इनामदार काल्पनिक अडचणी दाखवितात. ठराव केल्यावर दिलाच पाहिजे तो गांव कामगारांचा वाढता मुशाहिरा द्यावा लागू नये म्हणून दुसरें कांहीं मोजणी कबूल करीत नाहींत. मान्य केलेल्या सर्व पोट हिस्सेदारांची कबुली असल्याखेरीज मोजणी लागू करतां येत नाहीं. हल्लीं अमलांत असलेला हा नियम पुष्कळ इनाम गांवच्या कामीं मुख्य अडचण आहे. आपसांतील कलह व मतभेद यामुळें ठरावास कबूल होण्यास सर्व पोटहिस्सेदारांचें मन वळविणें ही गोष्ट बहुतेक अशक्य आहे.

**सरदार जी. एन्. मुजुमदार.** मोजणी न झालेल्या इनाम गावांतील कांहीं पोट हिस्सेदारांच्या हरकतीस न जुमानतां त्या गांवांत सक्तीनें तरमबंदी सुरू करण्याच्या उपायांचा सरकार विचार करीत आहे कां ?

**ऑनरेबल मि. मेथा.** मला याची नोटीस पाहिजे.

## राजुरी येथील जमीन महसुलाची बाकी थकविणाऱ्यांस कैद.

**मि. ना. रा. गुंजाळ.** अ. पुणे जिल्ह्यांतील जुन्नर तालुक्यांतील राजुरीचे जमीनमहसुलाची बाकी थकविणारे इसमांपैकीं कांहींस गेल्या थोडया महिन्यांत जमीनमहसुलाच्या कायद्याचें कलम १५७ प्रमाणें दिवाणी तुरुंगांत अटकेंत ठेविलें होतें का ?

ब. अशी तजवीज केली त्या बाबतींतली सारा देण्याच्या संबंधांतली राजुरी व भोंवतालच्या गांवच्या पिकांची आणेवारी काय आहे व ती कशी ठरली ही माहिती सरकार देईल का ?

**ऑनरेबल मि. मेहता.** चौकशा चालू आहेत.

## राजुरी गांवांतील जमीनमहसूल थकविणारे.

**मि. ना. रा. गुंजाळ.** अ. पुणें जिल्ह्यांतील जुन्नर तालुक्यांतील राजुरीचे ज्या इसमांस जमीनमहसुलाच्या कायद्याचें कलम १५७ प्रमाणें या सालीं तुरुंगांत ठेविलें त्या तीन इसमांस जेथें बहुधा फौजदारी कैदी ठेवितात त्या बंद खोलींत पोलिसांच्या ताब्यांत ठेवलें होतें का ही माहिती सरकार देईल का ?

ब. त्यापैकीं एक इसम मि. अनाजी तुकाराम हडवळे यांस मामलेदार जुन्नर यांनीं आपल्या घरीं सुमारें पांच तास नेलें व तेथें त्यांचें जेवण झालें व त्यांस पुन्हां कैदेंत पाठविण्यांत आलें ही गोष्ट खरी आहे का ?

क. वरील प्रसंगीं राजुरी गांवांतील बाकी थकविणारांस खालसाच्या ज्या नोटिसा निघाल्या त्या पेन्सिलीनें लिहिलेल्या होत्या. व त्यापैकीं बहुतेकांत वसूल करण्याची रकम चुकीची दाखल केली होती ही गोष्ट खरी आहे का ?

ड. वरील प्रसंगीं मालकाच्या समक्ष जप्त केलेल्या मालाचा एक तरी पंचनामा केला होता का ?

इ. वरील प्रसंगीं बाकी थकविणारांपैकीं कांहींचीं कांहीं भांडीं जप्त केलीं होतीं का ? असें असल्यास किती बाकी थकविणारांच्या बाबतींत अशी गोष्ट केली ?

फ. जप्तीच्या नोटिसा किती काढल्या ? सन १९२०-२१ सालची बाकी वसूल करण्याकरितां किती कामीं जप्त्या कराव्या लागल्या ? किती खातेदारांनीं आपली बाकी खुशीनें दिली ?

**ऑनरेबल मि. मेहता.** चौकशा चालू आहेत.

**प्रश्न ३ चें उत्तर.**

अ. या बैठकींतील त्यांच्या नंबर ४ या प्रश्नास दिलेलें उत्तर सन्माननीय सभासदानें पहावें.

ब. सन १९२३–२४ मधील राहुरीचे व भोंवतालच्या गांवचे पिकाच्या आणेवारीचें माहितीपत्रक सोबत जोडलें आहे. पिकांची पाहणी करून पिकांच्या किंमती ठरविल्या आहेत. अपेंडिक्स ३६

**प्रश्न ४ चें उत्तर.**

अ. पुणें शहरच्या सन्माननीय सभासदांनीं विचारलेल्या नंबर ४ च्या प्रश्नास दिलेलें उत्तर सन्माननीय सभासदानें पहावें. येथें दिवाणी तुरुंग नाहीं.

ब. आपला सोबती गणू यांनीं पैसा दिला तर आपणांस सोडावे अशी विनंती करण्यास त्याच्याच विनंतीवरून जुन्नर मामलतदाराच्या घरीं अनाजी तुकारामास नेलें होतें. हें बोलणें सुमारें पाव तास झालें. अनाजीचें जेवण मामलेदाराच्या घरीं झालें नाहीं.

क. होय. चुकीच्या हिशेबामुळें ज्यांत चुकीचे आकडे दाखल झाले अशी कांहीं उदाहरणें होतीं. परंतु वसुलाच्या वेळीं बरोबर रकम वसूल केली गेली.

ड. होय. जे त्यांच्या कुटुंबांतील माणसांच्या देखत केले गेले ते थोडे अपवाद खेरीजकरून.

इ. जप्तीपासून वगळलेलीं नसणारीं भांडीं शंभर कामांत जप्त केलीं.

फ. बाकी वसूल करण्यास खालसाच्या ४४९ नोटिसा केल्या गेल्या. १३४ कामांत जप्त्या कराव्या लागल्या आणि ३३ खातेदारांनीं आपल्या बाक्या खुषीनें दिल्या.

# चवथें सेशन.

## शिक्षण खात्याच्या प्रधानास दिलेल्या मानपत्राकरतां वर्गणी.

**मि. ना. रा. गुंजाळ.** सन्माननीय मि. बी. व्ही. जाधव हल्लींचे शिक्षणमंत्री यांस मानपत्र देण्याचा जरुरीचा खर्च भागविण्याकरतां, पुणें जिल्ह्यांत जुन्नर तालुक्यांत कांहीं पाटील व सरकारी नोकर यांनीं सुमारें एक हजार रुपयांची रक्कम नुकतीच जमविली ही खरी गोष्ट आहे कां ही माहिती सरकार देईल कां ?

**ऑनरेबल सर मॉरिस हेवर्ड.** मला वाटतें माहिती आलेली आहे. आणि आली असेल तर संपूर्ण उत्तर यापुढें देण्यांत येईल.

**ऑनरेबल सर मॉरिस हेवर्ड.** शिवनेरी कमिटीच्या विनंतीवरून हें मानपत्र शिवनेरी किल्ल्यावर तालुकालोकलबोर्डानें दिलें. मानपत्रदेण्याकरतां लोकलबोर्डानें रुपये २५ मंजूर केले व शिवाजीच्या जन्मभूमीची रोषणाई करणें व तिचा उत्सव करणें करतां शिवनेरी कमिटीनें रुपये ४५०-८ जमविले.

[ मि. कोठारी-शिवनेरी कमिटींत मुख्यत्वें गांवपाटील व सरकारी नोकर आहेत ही गोष्ट खरी का ?

**ऑनरेबल सर मॉरिस हेवर्ड.** मला माहिती नाहीं.

## वैद्यकाची देशीपध्दति.

**मि. ना. रा. गुंजाळ.** अ. सन १९२१ मध्यें सुधारणा अमलांत आल्यापासून वैद्यकाच्या देशी पध्दतीचा अभ्यास, शिक्षण व व्यवहार यांस उत्तेजन देण्याकरतां सरकारानें कांहीं तजविजी केल्या आहेत कां याची माहिती सरकार सांगेल का ?

ब. या बाबतींत दुसऱ्या कांहीं प्रांतिक सरकारांनीं कांहीं तजविजी केल्या आहेत किंवा कसें याविषयीं सरकारानें कांहीं चौकशा केल्या आहेत का ?

क. जर ( ब ) यास होकारार्थी उत्तर असेल तर अशा चौकशांचा परिणाम काय आहे ?

**ऑनरेबल मि. बी. व्ही. जाधव.** पुणें जिल्ह्याचे सन्माननीय सभासद यांनीं त्यांचे प्रश्न नंबर १८ आणि ४२ कायदे कौन्सिलच्या गेल्या बैठकींतले, यांस दिलेलीं उत्तरें पुन्हां पहावींत. त्यानंतर सातारा जिल्हा बोर्डानें आपला आयुर्वेदिक दवाखाना चालावा म्हणून देणगी मिळण्याबद्दल अर्ज केला आहे. ही देणगी पैशाची सवड असल्यास प्रथम एक वर्ष मिळेल.

[ मि. मौलवी रफीउद्दीन अहमद—आयुर्वेदिक व युनानी वैद्यक पद्धति संबंधाचा सरकारचा सल्लागार कोण आहे हें मला समजेल का ?

**ऑनरेबल मि. बी. व्ही. जाधव.** सर्जनजनरल.

## मोजणी न झालेल्या इनाम गांवांत हक्कनोंदणी.

**मि. ना. रा. गुंजाळ.** अ. पुणें जिल्ह्यांतील खेडतालुक्यांतील, ज्यांत प्रथम मोजणी अमलांत आणली नाहीं अशा कांहीं इनाम गांवांत हक्क नोंदणीचें काम सुरू केलें आहे किंवा नाहीं ही माहिती सरकार देईल का ?

ब. जर असेल तर अशा बाबतींत गांवचा नमुना नंबर ६ याची कोष्टकें १३ व १४ कशीं भरावींत याजबद्दल सरकारचे कांहीं हुकूम झाले आहेत का ?

**ऑनरेबल मि. मेथा.** अ. होय. ती पुढील सहा गांवात सुरू केली आहे.

( १ ) भावडी. ( २ ) पांगरी. ( ३ ) पाळू. ( ४ ) सुरकुंडी. ( ५ ) कान्हेवाडीबुद्रुक. आणि ( ६ ) कोरेगावखुर्द.

ब. गांवचा नमुना ६ यास फक्त चार कोष्टकें आहेत. जुन्या नमुन्यास फक्त १२ कोष्टकें ( खेरीज एक शेरे कोष्टक ) होतीं.

## धार्मिक ट्रस्ट.

**मि. ना. रा. गुंजाळ.** अ. पुणें जिल्ह्यांत त्यांचे हुकुमानें चालू असलेले व अधिकारानें निर्माण केलेले सर्व धार्मिक, सार्वजनिक, व

धर्मार्थ ट्रस्ट आहेत त्यांची ठिकाणें व नावें सांगण्याची मेहरबानी सरकार करील काय ?

ब. या ट्रस्टची व्यवस्था ज्या पंचाकडे सोंपविली आहे त्या पंचांच्या निवडणुकीची अगर नेमणुकीची प्रत्येक बाबतींत योजना कशी नियंत्रित केली आहे ?

क. त्यांच्या हिशेबांची तपासणी होण्याबाबत सरकारानें कांहीं योजना केली आहे का ?

**ऑनरेबल मि. वी. व्ही. जाधव.** या ट्रस्टची संख्या इतकी मोठी आहे कीं, विचारलेली माहिती गोळा करण्यापासून जो फायदा होण्याचा कदाचित् संभव असेल त्या मानानें माहिती मिळविण्याचे श्रम अत्यंत ज्यास्त आहेत.

[ मि. देव. विचारलेली माहिती मिळविणें बहुतेक अशक्य होण्याइतकी सरकार फार मोठी समजतात ती संख्या किती आहे? १०० २००, ३००, अगर ४००, ती आहे?'

**ऑनरेबल मि. बी. व्ही. जाधव.**—मला वाटतें ती त्यापेक्षां मोठी आहे व ती मिळविण्याला जो वेळ जाईल त्या मानानें ती महत्वाची नाहीं.

## पुणें व कुलाबा जिल्ह्यांतील गावपंचायतीस देणग्या.

**मि. ना. रा. गुंजाळ.** कुलाबा व पुणें जिल्ह्यांतील प्रत्येक गांवपंचायतींस संबंध असणाऱ्या जिल्हा बोर्डानें व सरकारनें सन १९२२-२३ आणि १९२३-२४ सालांत किती देणग्या दिल्या ही माहिती सरकार सांगेल का ?

**ऑनरेबल मि. शेख गुलामहुसेन.** सरकारनें देणग्या दिल्या नाहींत. जिल्हा बोर्डांनीं दिलेल्या देणग्याबद्दल सोबतच्या पत्रकांत माहिती दिलेली आहे.

| पंचायतीचें नांव | गांव पंचायतीच दिलेल्या बुकें वगैरे स्वरूपाची देणगी. | | | जिल्हालोकल बोर्ड १९२२-२३ | | | १९२३-२४ | | | एकूण | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ पुणें जिल्हा. | रु. | आ. | पै | रु. | आ. | पै | रु. | आ. | पै | रु. | आ. | पै |
| १ घोडे | ३६ | १३ | ० | ७६ | १० | ० | ७६ | ८ | ० | १८९ | १५ | ० |
| २ दौंड | १४६ | १४ | ९ | ८ | ७ | ० | ६ | ४ | ० | १६१ | ९ | ९ |
| ३ पौड | २३ | ८ | ९ | १८ | १३ | ० | १८ | १२ | ० | ६१ | १ | ९ |
| ४ वडगांव | २६ | २ | ३ | १८ | १५ | ० | १८ | १५ | ० | ६४ | ० | ३ |
| ५ भिगवण | १०२ | १३ | ९ | ० | १० | ० | १७ | ६ | ० | १२० | १३ | ९ |
| ६ हडपसर | ९५ | ५ | ९ | ६८ | १३ | ० | ६९ | ३ | ० | २३३ | ५ | ९ |
| ७ मनचर | २० | १२ | ६ | ७८ | ० | ० | ७८ | १४ | ० | १७७ | १० | ६ |
| ८ देहू | ३१ | ३ | ३ | ० | ० | ० | ४७ | १४ | ० | ७९ | १ | ३ |
| ९ खेड | ५६ | १५ | ९ | १२२ | १५ | ० | १२२ | १२ | ० | ३०२ | १० | ९ |
| १० चिंचवड | ११३ | १ | ३ | ३५ | १२ | ० | ३५ | १२ | ० | १८४ | ९ | ३ |
| ११ मुंढवे | २२ | ३ | ३ | ३६ | ५ | ० | ३३ | १४ | ० | ९२ | ६ | ३ |
| १२ नारायणगाव | २७ | ५ | ० | ११७ | ७ | ० | ११६ | ६ | ० | २६१ | २ | ० |
| १३ तळेगावढ० | ९४ | ६ | ६ | ४० | १२ | ० | १३१ | १ | ० | २६६ | ३ | ६ |
| १४ औंध | | | | | | | २१ | ४ | ० | ५६ | ० | ३ |
| १५ बोपोडी | ३४ | १२ | ० | ० | ० | ० | २२ | १५ | ० | २२ | १५ | ० |
| १६ मालेगाव बु. | १५ | १ | ३ | ७७ | १० | ० | ० | ० | ० | ९२ | ११ | ३ |
| १७ वेल्हे | २५ | ३ | ९ | २९८ | ६ | ० | ० | ० | ० | ३२३ | ९ | ९ |
| एकूण | ८७२ | ११ | ० | ९९१ | ७ | ० | ८१७ | १२ | ० | २६८९ | १४ | |

कुलाबा जिल्हा.

| | १९२३-२४ | एकूण |
|---|---|---|
| मेढे | ९१—४—६ | ९१—४—६ |
| चाणेरा | २५—३—११ | २५—३—११ |
| नाते | १८३—१२—११ | १८३—१२—११ |

| | | |
|---|---|---|
| खोपोली | ९८—३—० | ९८—३—० |
| खालापूर | ११८—४—६ | ११८—४—६ |
| या जिल्ह्यांतील दुसऱ्या गावपंचायतीस देणग्या दिलेल्या नाहींत. | ५१६-१२-१० | ५१६-१२-१० |

**पुण्यांतील मोठ्या कुळांतील माणसांस कोर्टांचे अमलापासून माफी.**

**मि. ना. रा. गुंजाळः**—मोठ्या पदवीमुळें ज्यांचेवर नेहमींच्या दिवाणी व फौजदारी कोर्टांत काम चालत नाहीं असे पुणें जिल्ह्यांतील माणसांचीं नांवें सरकार सांगेल का ?

**ऑनरेबल सर मॉरिस हेवर्डः**—नेहमींच्या दिवाणी कोर्टांच्या अधिकाराची माफी आहे अशी पुणें जिल्ह्यांत फक्त एकच बाई म्हणजे चिमणराव विठ्ठल पुरंदरे यांची विधवा स्त्री सरदार लक्ष्मीबाई या आहेत. फौजदारी कामांत अशी माफी कोणास नाहीं.

सरदार जी. एन्. मुजुमदारः—या बाईस कां माफी आहे ?

**ऑनरेबल सर मॉरिस हेवर्डः**—कारण बाकीचे मयत आहेत.

**सरदार जी. एन्. मुजुमदारः**—पुण्यांत इतके पुष्कळ सरदार आहेत व त्यांत ही एक बाई आहे. दुसऱ्या सरदारांस याप्रमाणें माफी कां नाहीं हें कळण्याची मला जरूरी आहे.

**ऑनरेबल सर मॉरिस हेवर्डः**—या माफीस जे पात्र होते त्यांची यादी फार वर्षांपूर्वीं केली गेली. व त्यानंतर या बाईखेरीज इतर सर्व माफी असणारे इसम मयत झाले.

**मि. जे. सी. स्वामीनारायणः**—यादीवर असणारे सरदाराचे वारसास ही माफी मिळत नाहीं का ?

**ऑनरेबल सर मॉरिस हेवर्डः**—मूळच्या यादींत ज्यांचीं नांवें आहेत त्यांखेरीज इतरांस ही माफी मिळत नाहीं.

**शेतकी खात्याचे डिव्हिजनल बोर्ड. सहकारिता व डिस्ट्रिक्ट लोकलबोर्ड यांचे कार्यक्रम व प्रोसीडिंग.**

**मि. ना. रा. गुंजाळः**—शेतकी खात्याचे डिव्हिजनल बोर्ड, को-ऑपरेशन व डिस्ट्रिक्ट लोकलबोर्ड यांची प्रोसीडिंग त्या त्या जिल्ह्यांत व विभागांतील वर्तमानपत्रें व लायब्ररी यांस पुरवली जातात कां?

**ऑनरेबल मि. ए. एम्. के. देहलवीः**—शेतकी खात्याचे डिव्हिजन व सहकारितेच्या सभांच्या प्रोसीडिंगाची त्रोटक माहिती व त्यांच्या सभांत वादविवाद झालेल्या विशेष महत्त्वाचे कलमांची हकीकत स्थानिक वर्तमानपत्रांत व को-ऑपरेटिव्ह किंवा शेतकीचे मासिक पुस्तकास पुरवली जाते. डिस्ट्रिक्ट लोकलबोर्डाच्या माहितीसंबंधानें स्थानिक स्वराज्याचे सन्माननीय प्रधान यास सन्माननीय सभासदानें माहिती विचारावी.

## एप्रिल व मे महिन्यांत भटकणाऱ्या गुरांचा कोंडवाडा.

**मि. ना. रा. गुंजाळ.** अ.

अ शेतकऱ्यांच्या गुरांना गायरानांत गवत नसल्या वेळीं तीं जेव्हां फारेस्टच्या जमिनीवर जातात व एप्रिल व मे महिन्यांत त्यांस कोंडवाड्यांत घालतात, त्यावेळीं शेतकऱ्यांना जें दुःख होतें त्याची जाणीव सरकारास आहे कां ही माहिती सरकार देईल कां?

ब. पुणें जिल्ह्यांतील प्रत्येक तालुक्यांतील एप्रिल व मे १९२४ या महिन्यांत अशीं गुरें कोंडवाड्यांत घातल्यापासून किती पैसा वसूल आला त्याचे आंकडे सरकार पुरवील कां?

**ऑनरेबल मि. ए. एम्. के. देहलवीः**—( अ ) गुरास कोंडवाडा केल्याने गांवकऱ्यांस कांहीं दुःख होतें याची माहिती सरकारास नाहीं.

ब. बंद भागांत मालकांनीं गुरे जाऊं देऊन चरू दिल्यानें गुरांकरतां एप्रिल व मे १९२४ मध्यें नुकसानीची रक्कम पुढीलप्रमाणें वसूल केली.

**नुकसानीची रक्कम.**

| रेंज. | एप्रिल १९२४ | मे १९२४ |
|---|---|---|
| पुणें. | [illegible]–०–० | [illegible]–०–० |

६

| | | |
|---|---|---|
| घोडे. | २२– ०–० | ०–०--० |
| दौंड. | ४– ८–० | ०–०--० |
| जुन्नर. | ४२– ०–० | ३७-०–० |
| खेड. | २३--१२–० | ४५–०--० |
| मावळ. | १०– ८–० | ४७--०–० |
| सासवड. | १०– ८–० | ४७–४–० |
| | ११३--४-- | १७८–४–० |

ही माहिती तालुकेवार ठेवलेली नसल्यानें फारेस्ट रेंजप्रमाणें दिली आहे.

## सिटी पोस्ट ऑफिस पुणें जवळ खिसेकातरू.

**मि. ना. रा. गुंजाळ.**

सिटी पोस्ट ऑफिस पुणें मध्यें पोस्टासंबंधीं कामास येणाऱ्या लोकांच्या खिशांतून सन १९२१।२२, १९२२।२३ व १९२३।२४ सालांत पैसे गेल्याबद्दलच्या कांहीं तक्रारी पुण्याच्या पोस्टाच्या आणि पोलिसच्या अधिकाऱ्याकडे आल्या आहेत कीं कसे याची चौकशी सरकार मेहेरबानीनें करील कां ?

**आनरेबल सर मॉरिस हेवर्ड:**—सरकारनें या बाबतींत चौकशी केली आहे. व त्यावरून ठरलें कीं, पुण्याचे डिस्ट्रिक्ट पोलिस सुपरिंटेंडेंट याजकडे १९२२ सालीं अशा दोन तक्रारी आल्या. व त्या रजिस्टरास दाखल केल्या. एक तक्रार फिर्यादीच्या खिशांतून घड्याळ चोरीस गेल्याची होती. व दुसरी तक्रार रुपये व नोटी चोरीस गेल्याची होती. सन १९२४ सालीं फक्त अशी एक तक्रार आली व ती रजिस्टरास दाखल केली. नुकसानीची रकम रु. २--१० होती.

## पुणें जिल्ह्यांतील बागायत जमिनीतील पिकांस भटकणाऱ्या गुरांचा उपद्रव.

**मि. ना. रा. गुंजाळ.** भटकणाऱ्या गुरांच्या उपद्रवामुळें बागायत

जमिनींत दुसरें पीक काढणें अतिशय खर्चाचें व त्रासाचें होत चाललें आहे याची जाणीव सरकारास आहे काय ?

( ब ) असेल तर भात व बागायत जमिनींत दुसरें पीक काढण्यास उत्तेजन यावें म्हणून अशा कामीं कांहीं तजवीज करण्याचा सरकारचा विचार आहे का ?

**ऑनरेबल मि. ए. एस्. के. देहलवी.** ( अ ) होय.

( ब ) रानटी जनावरें व भटकणारीं गुरें यांच्यापासून पिकाचें रक्षण करण्याच्या प्रश्नाचा विचार करण्याकारितां नेमलेल्या कमिटीचा रिपोर्ट व त्यावर सरकारनें सोडलेले हुकूम हे सन्माननीय सभासदानें पहावें.

## जमिनीचे एकीकरण करण्यासंबंधीं कायदा.

**मि. ना. रा. गुंजाळ.**

( अ ) शेतकीच्या जमिनीचे लहान लहान तुकडे होण्याचे बंद करण्याकरितां व लहान लहान तुकडे पूर्वींच झाले आहेत अशा जमिनी एकत्र करण्याकरतां कायद्याचा मसुदा कधीं आणण्याचा सरकारचा विचार आहे ?

( ब ) या कौन्सिलच्या हल्लींच्या सभासदांची मुदत संपण्यापूर्वीं सरकारास असें करतां येईल का याची माहिती सरकार देईल का ?

**ऑनरेबल मि. सि. व्ही. मेहता.** ( अ ) आणि ( ब ) सरकार बिलाचा कच्चा खरडा तयार करीत आहे व चालू वर्षांत तें पुढें आणण्याची सरकारची आशा आहे.

## तळेगांवपासून मंचरपर्यंत आगगाडीचा रस्ता करणें.

**मि. ना. रा. गुंजाळ.**

कै. डॉ. भाटवडेकर व मि. पुराणिक यांनीं ज्या योजनेमुळें रस्त्याची प्रत्यक्ष मोजणी केली होती. त्या पुणें जिल्ह्यांतील तळेगांवपासून मंचरपर्यंतच्या आगगाडीच्या रस्त्याच्या तयारीसंबंधाच्या योजनेची सरकारास माहिती आहे का ?

(ब) १९२४ च्या तिसऱ्या सेशनच्या प्रश्नोत्तराच्या ६ व्या लिस्टाच्या २४ व्या पानावर प्रसिद्ध झालेल्या माझ्या नंबर ४ च्या प्रश्नास दिलेल्या उत्तराचा,

माझा प्रश्न आगगाडीच्या रस्त्याबद्दल असल्यामुळे व 'रोडरेल्स' पद्ध-पद्धतीसंबंधानें नसल्यामुळें, माझ्या प्रश्नाशीं कांहीं संबंध आहे का ?

( क ) ( अ ) मध्यें सांगितलेल्या गोष्टीबद्दल पुण्याच्या डिस्ट्रिक्ट लोकल बोर्डानें कांहीं तजवीज केली असल्याबद्दल सरकारास माहिती आहे का ?

( ड ) कै. डॉक्टर भाटवडेकर आणि पुराणिक यांनीं हातीं घेतलेल्या मोजणीच्या कामाचा परिणाम काय झाला हें सरकार सांगेल का ?

**ऑनरेबल मि. सी. व्ही. मेहता.** ( अ ) आणि ( ड ) होय. कै. सर वी. के. भाटवडेकर यांनीं तळेगांवमंचर लाइट रेलवेच्या तळेगांव–खेड भागाची मोजणी केली होती व त्या रेलवेची योजना थांबली.

( ब ) होय. ज्याअर्थीं त्या रेलल्वेची योजना थांबली. आणि मि. एम्. बी. भाटवडेकर, कै. सर भालचंद्र यांचा मुलगा, यांनीं त्याऐवजीं रोडरेल्स पद्धतीवर ट्रामवेची रचना करण्याचे मनांत आणलें.

( क ) चाकण व मोईवरून चिंचवडपासून नारायणगांवपर्यंत रेलवे करण्याचा अर्ज डि. लोकल बोर्ड याचे प्रेसिडेंट यांजकडून आला. व योजलेल्या रेल्वेच्या खर्चाची सोय बसेना म्हणून प्रेसिडेंट डि. लो. बोर्ड पुणें यांस पुढें तजाविजीचें बोलणें चालवूं नये असें कळविण्यांत आलें.

## फौजदारी खटले चालविण्याचा अधिकार. असलेले मुनसफ.

**मि. ना. रा. गुंजाळ.** मुंबई इलाख्यांत फौजदारी खटले चाल-विण्याचा अधिकार असलेले कांहीं मुनसफ आहेत कां ? असल्यास ते कोणते ही माहिती सरकार देईल कां ?

**ऑनरेबल सर मॉरिस हेवर्ड.**

( पुढील मुनसफास फौजदारी अधिकार आहे. )

१ विरमगांवचे २ रे वर्गाचे मुनसफ.

२ भडोचचे मदत २ रे वर्गाचे मुनसप

३ तांडोमहंमदखान जिल्हा हैद्राबाद (सिंघ मधील) येथील २ रे वर्गाचे मुनसफ.

४ अपरसिंध फ्रॉन्टियर जिल्हा (सिंध) जाकोकाबाद येथील २ रे वर्गाचे मुनसफ.

## पुणें जिल्ह्यांतील हत्यारांचे परवाने.

**मि. रा. ना. गुंजाळ.**

(अ) दिसेंबर १९२४ अखेरच्या वर्षांत पुणें जिल्ह्यांतील प्रत्येक तालुक्यांत व पेठ्यांत हत्यारें धारण करण्याचे परवाने असलेले इसमांची संख्या किती ?

(ब) असें इसमास ज्या जातीचीं हत्यारें बाळगता येतात त्या हत्याराचे प्रकार.

(क) पुणें जिल्ह्यांतील प्रत्येक तालुक्यांत नांवाचे परवाने घेतल्याखेरीज ज्या इसमास हत्यारें बाळगतां येतात त्यांची संख्या.

(ड) असले परवानगी धारण करणारांचा उपयोग दरवडेखोर, डाके घालणारे यांच्या प्रतिकारार्थ अगर न होऊ देण्याचें बाबतींत एखाद्या गावच्या मंडळीस झाला असल्यास त्याची विशिष्ट उदाहरणें.

(ई) सन १९२४ दिसेंबर अखेर संपणारे वर्षांत ज्या लोकांस नवीन परवाने मिळाले व ज्या लोकांचे परवाने काढून घेण्यांत आले अशा लोकांची संख्या.

**ऑनरेबल सर मारिस हेवर्ड**—माहिती मागविली आहे.

## पुणें जिल्ह्यांतील हद्दनिशाण्यास दुरुस्ती व नवीन करणें.

**मि. ना. रा गुंजाळ**

पुणें जिल्ह्यांतील कोणत्या तालुक्यांत हद्दनिशाण्या नवीन करणेचें व दुरुस्त करण्याचें काम चालू आहे.

(ब) जमीन धारण करणारांनीं चुकीच्या जागीं हद्दनिशाण्या उभ्या करण्याचे श्रम करूं नयेत व खर्चांत येऊं नये म्हणून त्यांस हद्दनिशाण्या अगदीं बरोबर जागेवर उभारतां याव्या व दुरुस्त करतां याव्या. म्हणून

त्यांस हद्द निशाण्याची जागा दाखविण्याची मदत करण्याची सरकारनें काय व्यवस्था केली आहे.

(क) सरकारमदतीनें खेड तालुका जिल्हा पुणें मध्यें सन १९२४ डिसेंबर अखेर नवीन हद्दनिशाण्या केल्या व दुरुस्ती केल्या त्याबद्दल किती पैसा वसूल झाला व किती बाकी आहे.

(ड) हद्दनिशाण्यांचें रक्षण करणें हें वतनदार महारांचें एक काम आहे अगर नाहीं. ही माहिती सरकार देईल का.

खातेदारास हद्दनिशाण्यांचें दुरुस्तीचें कामीं मदत करण्याकरतां हुकूम काढले आहेत का ?

**ऑनरेबल मि. सी. व्ही. मेहता**—माहिती मागविली आहे.

## पुणें जिल्ह्यांतील गायरान.

**मि. ना. रा. गुंजाळ.**

(अ) पुणें जिल्ह्यांतील ज्या गावांस पुरेसें गायरान नाहीं असें सन १९२४ च्या तिसरे सेशनांतील पहिले लिस्टांत प्रसिद्ध झालेले माझ्या नंबर ५ च्या प्रश्नांचें उत्तरावरून दिसते. त्या शिलकी राहिलेल्या ३६ गांवची नांवनिशीं.

(ब) ज्या सत्तावन गांवास अपुरें गायरान आहे त्यांतील प्रत्येक गांवचे गायरानाचें क्षेत्रफळ व सर्वांत अलीकडे मिळण्याजोगी माहिती असेल तीप्रमाणें प्रत्येक गावांतील गुरांची संख्या.

(क) ३६ गावांपैकीं इनामी गांवें किती आहेत व त्यांचीं नावें.

**ऑनरेबल मि. सी. व्ही. मेहता**—माहिती मागविली आहे.

## गवतलिलांव.

**मि. ना. रा. गुंजाळ.**—१ एप्रिल ते ३१ मार्च १९२४ पर्यंत पुणे जिल्ह्यांतील खेड तालुक्यांतील बिबी व वेताळे गांवांत कोंडवाड्यापासून व नुकसानीबद्दल रिझर्व फारेस्टाच्या बंद भागांत गवत कापण्याच्या हक्काचे लिलांवाचे रकमेपासून किती उत्पन्न आले ही माहिती सरकार देईल का ?

**ऑनरेबल मि. ए. एम्. के. देहलवी.**—माहिती मागितली आहे.

## खेड तालुक्यांतील गायरानाचें क्षेत्रफळ.

**मि. ना. रा. गुंजाळ.**—पुणें जिल्ह्यांतील खेड तालुक्यांतील गायरानाचें क्षेत्रफळ सन १८७९ सालीं अगर मुंबई जमिन महसुलाचा कायदा पास होण्यापूर्वी किती होतें व सन १९२४ सालीं किती आहे ?

( ब ) दोन गुरास १ एकर या प्रमाणांत ज्या गांवांस गुरचरण नाहीं अशीं गांवें खेड तालुक्यांत किती आहेत.

**ऑनरेबल मि. सी. व्ही. मेहता.**—माहिती मागितली आहे.

## प्रत्येक गुरामागें वाढीची फी.

**मि. ना. रा. गुंजाळ.**—

शेतकऱ्याच्या स्वतःच्या गांवीं पुरेशीं गुरचरण नाहीं म्हणून शेजाऱ्च्या गांवांतील सरकारी रानांत गुरें गेलीं तरी गुरामागें एक रुपाया वाढती फी द्यावयास लागल्यामुळें शेतकऱ्यांस किती त्रास होतो त्याची जाणीव सरकारास आहे का ?

( ब ) गांवचीं गुरें व परगांवचीं गुरें याबद्दल नेहमींच्या दराप्रमाणें व वाढलेल्या दराप्रमाणें चरण्याचे फीची रक्कम, गवत कापण्याचे लिलांवाची रक्कम आणि नुकसानीची व दंडाची रक्कम पुणें जिल्ह्यांतील खेड तालुक्यांत १ जानेवारी ते ३१ डिसेंबर १९२४ पर्यंत किती वसूल झाली.

**ऑनरेबल मि. सी. व्ही. मेहता.**—चौकशी चालू आहे.

## पुणें जिल्ह्यांतील मेलेल्या जनावरांच्या कातड्यांचे मालकीबद्दल गांवकरी व महार यांचेंमधील तंटे.

( अ ) मेलेल्या जनावरांच्या, व विशेषतः असलीं जनावरें विष घालून मारण्याचा संशय महारावर असतांना, कातड्याच्या मालकीसंबंधानें गांवकरी व महार यांचेमधील कांहीं तक्रारी, पुणें जिल्ह्यांत वार्षिक फिरतीवर असतांना त्यांचे जिल्हाअधिकारी अगर सरकार यांनीं ऐकल्या आहेत कां ?

(ब) असल्या वादामुळें गांवकऱ्यांनीं वेसकर महारास नेहमींची भाकरी देण्याचें बंद केलें आहे का ?

( क ) ( अ ) यास होकारार्थी उत्तर असल्यास सरकारानें मध्यें पडून कोणत्या गांवांतील तंटे कोणत्या प्रकारें मिटविले
याची माहिती सरकार देईल का ?

**ऑनरेबल मि. सी. व्ही. मेहता.**—माहिती मागविली आहे.

## पुणें जिल्ह्यांतील खेड तालुक्यांतील पिकें.

**मि. ना. रा. गुंजाळ.**

पुणें जिल्ह्यांतील खेड तालुक्याच्या पश्चिम भागांतील खरिपाचीं पिकें या वर्षीं किडीमुळें इजा पावलीं याची जाणीव सरकारास आहे का ? ही माहिती सरकार सांगेल का ?

( ब ) ज्या शेतकऱ्यांचें नुकसान झालें त्यांस शेतकी खात्याकडून आणि मुलकी खात्याकडून काय मदत दिली गेली ?

**ऑनरेबल मि. सी. व्ही. मेहता.**—माहिती मागविली आहे.

## दिवाणी दाव्यांत समन्स बजावणें.

**मि. ना. रा. गुंजाळ.**

दिवाणी दाव्यांत प्रतिवादीवर समन्साची बजावणी करणें यापासून किती वेळ जातो व किती त्रास होतो याची जाणीव सरकारास आहे का याची माहिती सरकार देईल का ?

**ऑनरेबल सर मॉरिस हेवर्ड.** प्रतिवादीवर समन्स बजावण्याच्य अडचणींची सरकारास जाणीव आहे.

[ **सरदार मुजुमदार.** या अडचणी दूर करण्याच्या उपायांचा सरकार विचार करते आहे का ? ]

**ऑनरेबल सर मॉरिस हेवर्ड.** प्रतिवादीवर समन्स बजावणें हें काम कठिण आहे जेणेंकरून प्रतिवादी अधिक लवकर पुढें आणतां येईल अशी योजना सन्माननीय सभासदानें सुचविल्यास त्या सूचनेमुळें आम्हांस फार आनंद होईल.

## पुणें जिल्ह्यांत फॉरेस्टांतील लावणीलायक जमिनी.

**मि. ना. रा. गुंजाळ.**

पुणें जिल्ह्यांतील प्रत्येक तालुक्यांतील लावणीलायक फॉरेस्ट जमिनीचे क्षेत्रफळ.

( ब ) ज्या अगदीं गरीब शेतकऱ्यांस फार थोडी अगर मुळींच जमीन लागवडीस नाहीं अशांस असल्या जमिनी मिळवून देण्याच्या कामीं सरकारनें योजलेले उपाय.

(क) पुणें जिल्ह्यांतील प्रत्येक तालुक्यांतील गुरचरण अगर फॉरेस्ट जमिनी ज्यांत गुरचरणीची फी दिल्यावर गुरांस चारतां येतें अशा जमिनींचें क्षेत्रफळ व त्यापैकीं किती फॉरेस्ट खात्याकडे आहेत व किती मुलकी खात्याकडे आहेत याची फोड.

( ड ) सर्वांत अलीकडील मिळण्याजोग्या आंकड्याप्रमाणें प्रत्येक तालुक्यांतील व पेठ्यांतील गुरांची संख्या.

**ऑनरेबल मि. ए. एम्. के. देहलवी.** माहिती मागितली आहे.

## पुणें जिल्ह्यांतील इनामगांवचे रेकार्ड.

**मि. ना. रा. गुंजाळ.** पुणें जिल्ह्यांतील ज्या इनाम गांवांत पुष्कळ हिस्सेदार आहेत अशा इनामदारांचें मालकीचे, आणि म्हणून जे सरकारच्या तालुक्याचे कचेरींत पाठविलें जात नाहीं अशा रिकॉर्डाची सुरक्षितता कशी ठेवावी याजबद्दल व अशा रिकॉर्डास सर्व लोकांस कसा प्रवेश व्हावा याचे माहितीचे कांहीं नियम अमलांत आहेत का ? याची माहिती सरकार देईल का ?

**ऑनरेबल मि. सी. व्ही. मेहता.** माहिती गोळा होत आहे.

## पुणें जिल्ह्यांतील हातमागाचा उद्योग.

**मि. ना. रा. गुंजाळ.**

(अ) पुणें जिल्ह्यांतील तालुकानिहाय डिसेंबर १९२४ मध्यें काम करीत असलेले हातमागाची संख्या.

( ब ) ज्या गांवांत हातमागाचें काम बऱ्याच प्रमाणावर चालतें अशीं पुणें जिल्ह्यांतील प्रत्येक तालुक्यांतील मुख्य गांवें.

( क ) पुणें जिल्ह्यांत हातमागाचा उद्योग वाढविण्याचें कामीं सरकारनें काय तजविजी केल्या आहेत ?

( ड ) या हातमागावर उपयोगांत आणलेलें सूत देशी अगर परदेशी तयार केलेलें असतें ?

( इ ) ज्या हातमागावर हातानें काढलेल्या सुताचेंच कापड काढतात अशांची संख्या.

( फ ) पुणें जिल्ह्यांत हातानें सूत काढण्याचें कामीं उत्तेजनार्थ कांहीं उपाय योजलें असल्यास तें कोणतें.

**ऑनरेबल मि. जाधव.** माहिती मिळविली जात आहे.

## इनामगांवांतील हिशेब.

**मि. ना. रा. गुंजाळ.**

कमिशनर मध्यभाग यांचे सर्क्युलर हुकूम तारीख ८ एप्रिल १९०९चे असूनही इनामदार व त्यांची रयत यांचेमधील इनाम गांवांतील ठेवलेले हिशेबाकडे इनामगांवांस जाणारे मुलकी अधिकारी बहुधा लक्ष देत नाहींत ही गोष्ट सरकारास माहीत आहे का ? ही माहिती सरकार देईल का ?

( ब ) जर असें असेल तर सरकार या बाबतींत कांहीं तजवीज करील का ?

**ऑनरेबल मि. सी. व्ही. मेहता.**

( अ ) नाहीं.

( ब ) उत्पन्न होत नाहीं.

## पुणें जिल्ह्यांतील इरिगेशन मोजणीचे काम.

**मि. ना. रा. गुंजाळ.**

( अ ) इरिगेशन मोजणीचे एकादें काम पुणें जिल्ह्यांत चालूं आहे का ?

( ब ) जर चालू असेल तर डिसेंबर अखेर कोणत्या जातीचें काम केलें ?

( क ) पुणें जिल्ह्यांतील खेड तालुक्यांत भिमानदीवर चास व भिमाशंकर गांवीं पाण्याची मोजणी करण्याचा हेतु काय

ही माहिती सरकार देईल का ?

( ड ) प्रयोगाचें नमुन्याचें काम किती दिवस चाललें आहे व आणखी किती दिवस तें चालू राहील ?

**ऑनरेबल मि. कावसजी जहांगीर.**

( अ ) होय.

( ब ) निरालेफ्ट बँक कॅनलची नवीन रचना होण्याकरितां तपशीलवार नकाशे करण्यासंबंधाचे व मुठाराइट बँक कॅनाल यांतून गळून जाणारे पाण्याचे बचावाकरितां पाणी गळून जाऊं नये म्हणून त्यास गिलावा करण्याकरतां कांहीं लांबीचें नकाशे तयार करणें व मोजणी करणें (cross section) यासंबंधाच्या मोजण्या, क व ड, चास व भिमाशंकर येथें पाण्याचीं यंत्रे नसून पावसाचीं यंत्रें उभारलीं आहेत. कमान येथें १९०६ मध्यें एक पाण्याचे यंत्र उभारलें आहे भिमानदीचा प्रोजेक्ट ठरविण्याकरतां या पाण्याच्या व पावसाच्या यंत्रानें माहिती गोळा होत आहे. या प्रोजेक्टासंबंधीं कांहीं निश्चित ठराव ठरेपर्यंत कमान येथील पाण्याचें यंत्राचें काम चालणार आहे.

## ऑनररी माजिस्ट्रेटांच्या नेमणुका.

**मि. ना. रा. गुंजाळ.** ऑनररी मॅजिस्ट्रेट निवडण्याच्या कामीं सरकार तत्व कोणते पाळतें. असल्या निवड करण्याच्या माणसाचे गुण व अवगुण कोणते समजले जातात ?

फौजदारी कोर्टानें दंडाची शिक्षा दिली असल्यास ती अवगुण समजली जाते का ?

( ब ) तारिख १३ नोव्हेंबर १९२४ च्या मुंबई गवर्नमेंट ग्याझीटचे भाग १ पानें २६७६ व २६७७ यांत ज्यांचीं नांवें प्रसिद्ध झालेलीं आहेत

च ज्यांस पुणे जिल्ह्यांकरतां ऑनररी मॅजिस्ट्रेट नेमले आहे त्यांचे विद्येसंबंधीं गुण काय आहेत.

(क) या ऑनररी मॅजिस्ट्रेटांपैकीं कोणी अशी नेमणूक व्हावी म्हणून अर्ज केले होते का ?

( ड ) यापैकीं कोणास फौजदारी कोर्टानें दंडाची शिक्षा दिली आहे का ?

ही माहिती सरकार देईल का ?

**ऑनरेबल सर मॉरिस हेवर्ड.** माहिती मिळविली जात आहे.

## मुनसफांचे अधिकार चालविणारे इनामदार व जहागीरदार.

**मि. ना. रा. गुंजाळ.**

रेग्युलेशन १३ सन १८३० प्रमाणें जे मुनसफांचे अधिकार चालवीत आहेत अशा चार इनामदार व जहागीरदारांचीं नावें व त्यांच्या हद्दी, व प्रत्येकास किती अधिकार आहे त्याची मर्यादा ही माहिती सरकार देईल का ?

( ब ) ३१ दिसेंबर १९२४ अखेरच्या वर्षांत प्रत्येकानें किती दिवाणी दाव्यांचे निकाल केले ?

( क ) स्टांप, कोर्ट फी व दुसऱ्या प्रोसेस फी ब्रिटिश हद्दींत ज्याप्रमाणें लागतात तेच नियम या जहागीरदार कोर्टास लागू आहेतना ?

**ऑनरेबल सर मॉरिस हेवर्ड.** माहिती मिळविली जात आहे.

## शाळामास्तरकडून खेडेगांवास औषधोपचार.

**मि. ना. रा. गुंजाळ.** पुणें जिल्ह्यांत कांहीं खेडेगावांत औषधोपचाराच्या योजनेचा ( अ ) प्रयोग पहाण्याचें काम करण्यास ज्यांस निवडलें आहे त्या शाळामास्तरांचीं नांवें व गांवें ( ब ) अशीं पसंत केलेलीं गांवें भररस्त्यावर आहेत अगर तालुक्याच्या आंतील भागांत आहेत. ( क ) प्रयोगाचा परिणाम काय झाला आहे ? व पुढील वर्षीं ही योजना दुसऱ्या गावास वाढविण्याचा सरकारचा विचार आहे कां ?

ही माहिती सरकार देईल का ?

**ऑनरेबल मि. बी. व्ही. जाधव.** माहिती मिळविली जात आहे.

## कुत्र्याच्या विषावर उपचार.

**मि. ना. रा. गुंजाळ**

( अ ) १ जानेवारी १९२४ ते ३१ दिसेंबर १९२४ पर्यंत या इलाख्यांतील प्रत्येक मध्यभागीं दवाखान्यांत कुत्र्याच्या विषावर उपचार केलेल्या रोग्यांची संख्या.

( ब ) त्यांच्यापैकीं सरकारी नोकर किती होते व खासगी इसम किती होते ?

( क ) औषधोपचार करूनही जे मेल्याचें कळतें अशा रोग्यांची संख्या किती ?

( ड ) ३१ दिसेंबर १९·४ अखेरच्या वर्षांत रोग्यापासून किती फी वसूल केली गेली.

( इ ) किती रोग्यास फुकट औषधोपचार केला.

**ऑनरेबल मि. बी. व्ही. जाधव.** माहिती मागविली जात आहे.

## पुणें जिल्ह्यांतील वतनदार पाटलांचा मुशाहिरा.

**मि. ना. रा. गुंजाळ.**

( अ ) ज्यांस वतनाच्या जमिनी आहेत त्यांच्या बाबतींत

( ब ) ज्यांस वतनाच्या जमिनी नाहींत त्यांच्या बाबतींत

पुणें जिल्ह्यांतील एका वतनदार पाटलास कमींत कमी व ज्यास्तींत ज्यास्त वार्षिक मुशाहिऱ्याची किती रकम मिळते.

**ऑनरेबल मि. सी. व्ही. मेहता.** माहिती मागविली आहे.

## फौजदारी अधिकार चालवीत असलेले सरदार इनामदार व जहागीरदार.

**मि. ना. रा. गुंजाळ.**

मुंबई इलाख्यांत आपल्या इनाम गांवच्या हद्दींत फौजदारी अधिकार चालविण्यास ज्यास परवानगी आहे असे सरदार इनामदार किंवा जहा-

गीरदार कोणी आहेत का ? असल्यास ते कोण आहेत ही माहिती सरकार देईल कां.

**ऑनरेबल सर मारिस हेवर्ड.** माहिती मिळविली जात आहे.

## हक्कदार व अमलदार यास देण्याचा पुणें जिल्ह्यांतील इनामगांवचा हक्काचा पैसा.

**मि. ना. रा. गुंजाळ.** देशमुख, देशपांडे, ग्रामजोशी, मोकाशी आणि इतर अशा हक्कदारांस व अंमलदारास मिळण्याकरितां पुणें जिल्ह्यांतील इनाम गांवाकडून तालुक्याच्या तिजोरींत हक्काचे पैसे किती पाठविले गेले, व दिसेंबर १९२४ अखेर प्रत्येक तालुक्यांत न दिले गेलेले किती शिल्लक आहेत ही माहिती सरकार देईल का ?

**ऑनरेबल मि. सी. व्ही. मेहता.** माहिती मागविली आहे.

## पुणें जिल्ह्यांतील पावसाचीं यंत्रें.

**मि. ना. रा. गुंजाळ.** ( अ ) पुणें जिल्ह्यांतील खेड तालुक्यांत कोणत्या गांवीं पाऊस मोजण्याचीं यंत्रें ठेविलीं आहेत ?

( ब ) त्यापैकीं रेव्हिन्यु खात्याच्या देखरेखीखालीं किती व इंजिनीयर खात्यच्या देखरेखीखालीं किती?

**ऑनरेबल मि. ए. एम्. के. देहलवी.** चौकशी चालू आहे.

## पुणें, मुंबई, साष्टी आणि कराची येथील नानग्याझीटेड कामगारास काम्पेनसेटरी अलावन्स.

**मि. ना. रा. गुंजाळ.** (अ) पुणें, मुंबई, साष्टी, व कराची, येथील निरनिराळ्या खात्यांतील नानग्याझीटेड कामगारांस कामपेनसेटरी अलावन्स देण्याच्या बाबतींत, सरकारचा कांहीं निकाल झाला आहे का ?

( ब ) जर झाला असेल तर तो निकाल काय आहे हें सरकार सांगेल का ?

( क ) हा भत्ता देण्याचें ठरलें असेल तर ग्याझीटेड ऑफिसरास अशी रकम ज्या तारखेस मंजूर झाली त्या तारखेपासून तो नानग्याझी टेड कामगारास दिला जाईल कां ?

( ड ) दिवाणी व फौजदारी कोर्टांतले नकला करणारे धरून हंगामी नोकरांचा व बेलिफांचा त्यांत समावेश होईल का ?

**ऑनरेबल मि. एच्. एस. लॉरेन्स.** मि. एल्. बी. भोपटकरांनीं १३ मार्च १९२५ रोजीं विचारलेल्या प्रश्नास दिलेलें उत्तर सन्माननीय सभासदानीं पहावें.

## खालसा व इनाम गांवांतील चावड्या.

**मि. ना. रा. गुंजाळ.** ( अ ) खालसा व इनाम गांवांत नवीन चावडी बांधण्याच्या खर्चाचा कितवा हिसा इनामदार, गांवकरी, लोकल-बोर्ड व सरकार यांच्यांत द्यावा याचें कांहीं प्रमाण आहे कां व असल्यास तें कोणतें ही माहिती सरकार देईल का ?

( ब ) चावड्यांचा उपयोग सरकारनें लोकलबोर्ड कामगारानीं, गांवकऱ्यांनीं व इनामदारांनीं कोणत्या कामाकडे करावा ?

( क ) चावड्यांची रिपेर व मरामत करण्याबद्दल जबाबदार कोण आहे?

**ऑनरेबल मि. सी. व्ही. मेहता.** माहिती मिळविली जात आहे.

## भाड्याच्या कायद्याच्या दुरुस्तीचे बिल.

**मि. ना. रा. गुंजाळ.** ( मराठींत भाषण ).

महाराज,

जे गरीब लोकांच्या हिताचें आहे तें त्यांचें बिल आणण्याबद्दल ज्यांनीं हें बिल आणलें त्या सन्माननीय सभासदांचा मी गौरव करतों. आपण निवडलेले किंवा नेमलेले सभासद म्हणून गेल्या एक वर्षभर या सभेंत आपण असल्यापासून,माझे सन्माननीय मित्र सन्माननीय मि. दाभोळकर यांचा गरीब लोकांच्या हिताच्या संबंधाचे जें सरकारी बिल आहे त्यास विरोध करण्याचे ज्या वेळीं आपण पहातों असा हा एकच प्रसंग आहे.

[ मि. आर. डी. शिंदे. महाराज, व्यवस्था असावी म्हणून मी उभा राहतों. सन्माननीय सभासद म्हणतात कीं, सन्माननीय सभासद मि. दाभोळकर सार्वजनिक हितसंबंधाच्या बिलास विरोध करीत आहेत. ]

**ऑनरेबल–अध्यक्ष.** हे शिस्तीच्या विरुद्ध नाहीं. हे त्यांचें मत आहे.

**मि. ना. रा. गुंजाळ.** खरें बोलावयाचें तर गरिबांची व खालच्या मध्यम वर्गाची हल्लीं मुंबईत रहाण्याच्या जाग्यांच्या बाबतींतला विचार केला तर, काय स्थिति आहे यांची ज्यांना माहिती आहे, ते या बिलास विरोध करणार नाहींत व गरिबांच्या हिताकरितां सरकारनें हें जें बिल आणलें आहे त्यास विरोध करणारे सन्माननीय सभासद असलेले पाहणें हे शोकजनक आहे. इतकें बोलून या बिलाचे पहिले वाचनास मी पाठिंबा देतों.

## फोटो नकलाकरतां सामान.

**मि. ना. रा. गुंजाळ** ( मराठींत भाषण )

महाराज,

दस्तैवजाच्या फोटोनकला करण्याची पद्धति, पुणें, सातारा व सोलापूर या तीन जिल्ह्यांत अमलांत आहे. या ठिकाणच्या लोकांनीं या पद्धतीच्या असमाधानकारतेबद्दल जोराच्या तक्रारी केल्या आहेत. या तक्रारीकडे सरकारांनीं कांहीं लक्ष दिलें आहे का असें मी विचारतों. पुष्कळ देशी भाषेंतलि वर्तमानपत्रांतून या पद्धतीविषयीं व तिचे दोषाविषयीं वादविवाद चाललेला आहे ही गोष्ट मी सभासदांच्या नजरेला आणतों. आणि त्याचा सभासद विचार करतील अशी मी आशा करतों. सरकारानें एकादे अन्यायाचें व लोकांस न आवडणारें काम सुरू केलें म्हणजे त्याबद्दल गरीब शेतकऱ्यांचें नुकसान होतें. ही गोष्ट याचा दुर्दैवी भाग आहे. व हल्लीच्या उदाहरणांत या पद्धतिमुळें सर्वांत जास्त नुकसान शेतकऱ्यांचेंच होणार आहे. रजिस्टरखात्याकडून संबंध असणाऱ्या पक्षकारांस दिलेल्या नकलावरून, फोटोनकलापद्धति कशी असमाधानकारक आहे हें सहज दिसेल. पुण्यांत या पद्धतीचा खर्च मंजूर होण्याच्या वाटाघाटीच्या वेळीं सन्माननीय सभासदास ५०,००० रुपयांच्या दस्तैवजाची नकल दाखविली गेली, ही गोष्ट बहुधा सन्माननीय सभासदास आठवत असेल. व त्या दस्तैवजाच्या पक्षकारांच्या सह्या त्या नकलेवर नव्हत्या ही ही गोष्ट त्यांच्या ध्यानांत असेल. या तीन जिल्ह्यांत ही पद्धति चालू केल्यापासून तिजविषयीं लोकांच्या अतिशय तक्रारी चालू आहेत ही

गोष्ट मी सभासदांच्या नजरेस आणतों. आणि ही पद्धति किती अन्यायाची आहे हें साताऱ्याचे सन्माननीय सभासद (मि.सोमण,यांनीं दाखविलें आहे. म्हणून मला आशा आहे कीं,ज्या जिल्ह्यांत हल्लीं ही पद्धति चालू आहे त्या जिल्ह्यांतील लोकांस ती फोटोनकलापद्धति पसंत नाहीं हें सरकारच्या मनावर ठसविण्याच्या हेतूनें ही रक्कम फेटाळून लावण्यांत ह्या सभेंतील सर्व पक्षाचे सभासद एकत्र होतील.

## कासंद्रा गांवाजवळ साबरमती नदींत मासे मारणें.

**मि. ना. रा. गुंजाळ.** ( मराठींत भाषण ).

मि. प्रेसिडेंट. सन्माननीय ठराव आणणारे म्हणतात कीं, तेथें एक देवालय आहे व तेथें नोटिस लावविली आहे. पुणें जिल्ह्यांतील देहू व आळंदी या दोन यात्रेच्या ठिकाणीं कोणास मासे मारूं देत नाहींत. व ही फार दिवसांची धर्मसंबंधीं चाल त्या ठिकाणीं आहे. हिंदु धर्मासंबंधीं पुस्तकांत या दोन जागांचे वर्णन सांपडेल.व त्या पुस्तकांतल्या ठिकाणीं कोणास मासे मारण्यास परवानगी नाहीं हें दाखविण्यास पुरेसा आधार. आहे या जागीं मासे मारण्यासंबंधानें या नियमांचे एक दोन वेळां उल्लंघन झालें. परंतु हा खटला कोर्टांत नेल्यावर मासे मारण्याची तेथें बंदी झाली. असें असूनही, कधीं कधीं शिपाई व दुसरे लोक तेथें मासे मारण्याठ येतात. व अशा वेळीं नेहमीं त्रास पडतो. धर्माच्या दृष्टीनें या गोष्टीकडे पाहून, व जेथें अशी देवळें व पूजेची स्थानें आहेत तेथें सर्व वनस्पति आहारी असतात हें पाहून असल्या जागीं मासे मारण्याची सरकारनें बंदी करावी असें मला वाटतें. त्या देवळानजिक रहाणारे सर्व लोक जे वनस्पति आहारी आहेत त्यांच्या मनाची स्थिति लक्षांत आणून सरकारनें मध्यें पडून मासे मारणें बंद करावें असें मला वाटतें. कासंद्रा गांवाजवळ मासे मारण्याची बंदी करावी ही ठरावांत असलेली विनंति आहे. नदींत मासे मारण्याची ज्यास जरूरी आहे त्यांनीं नदीच्या दुसऱ्या कांठास जाऊन तसें करावें. नकाशांत दाखविलेली परिस्थिति मी पाहिली आहे व कौन्सिल या ठरावास पाठिंबा देईल अशी मी आशा करतों.

## नारायणराव रामजी गुंजाळ यांनीं मुंबई कायदे कौन्सिलांत विचाराकरतां पाठविलेले ठराव.

१ कुळकर्णी वतनाचे 'कम्युटेशन' होण्याच्या आधीं ज्या प्रकारची कुळकर्णी वतनपद्धति होती त्याप्रमाणेंच पुन्हां ती करण्याबद्दल हुकूम द्यावेत अशी या कौन्सिलची गव्हर्नर इन् कौन्सिल यांस शिफारस आहे.

२ पाटील यास आपल्या दर्जाप्रमाणें वागतां यावें म्हणून त्यास सरकारांतून दरसालची रोख अगर जमिनीपासूनची, अगर अंशतः रोख व अंशतः जमिनीपासूनची निदान तीनशें रुपयांची प्राप्ति करून द्यावी अशी या कौन्सिलची गव्हर्नर इन् कौन्सिल यांस शिफारस आहे.

३ शेतकऱ्यांची स्थिति सुधारण्यासाठीं एका गांवांत एका शेतकऱ्यांस द्यावी लागणारी शेतसाऱ्याची रक्कम दरसालची आठ रुपयांच्या आंत असेल तर ती कायमची माफ व्हावी अशी या कौन्सिलची गव्हर्नर इन् कौन्सिल यांस शिफारस आहे.

४ या इलाख्यांत कायमची जमीनधारापद्धति अमलांत आणावी अशी या कौन्सिलची गव्हर्नर इन् कौन्सिल यांस शिफारस आहे.

५ या इलाख्याच्या रेजिस्ट्रेशन खात्यांत अलिकडे सुरू केलेली फोटो नकलांची पद्धति एकदम बंद करावी व जुनी पद्धति पुन्हा सुरू करावी अशी या कौन्सिलची सरकारास शिफारस आहे.

६ या कौन्सिलच्या सभासदांनीं सार्वजनिक हितान हिताची कांहीं माहिती मागितली असतां ती सर्व खात्यांच्या मुख्याधिकाऱ्यांनीं परभारें द्यावी असे त्यांस हुकूम करावे अशी या कौन्सिलची सरकारास शिफारस आहे.

७ पगारवाढ देण्याच्या कामीं न्याय खात्यांतील पंधरा रुपये पगाराच्या कारकुनांची नोकरी १९१४ ते १९२० पर्यंतची मोजण्याबद्दल लवकर हुकूम व्हावेत अशी या कौन्सिलची सरकारास शिफारस आहे.

८ मुंबई इलाख्याचा फौजदारी व मुलकी कारभार अधिक चांगला चालावा म्हणून पुढील फेरफार करावेत अशी या कौन्सिलची सरकारास शिफारस आहे.

श्री ग्रंथ संग्रहालय

( १ ) गुन्ह्यासंबंधाच्या कायद्याखालील अधिकार मुलकी अधिकाऱ्यांनीं चालवूं नयेत.

( २ ) कमिशनरच्या जागा कमी कराव्यात.

( ३ ) प्रांताचे अधिकारी म्हणजे विभागाचे अधिकारी कमी करावेत. व जेथें जरूर असेल तेथें कलेक्टरास 'पर्सनल असिस्टंट' द्यावा.

४ मामलेदारांची संख्या निमे कमी करावी. एका मामलेदाराला दोन तालुक्याचा ताबा द्यावा. व मामलेदारांचे पगार व पुढील बढती सुध-राव्या.

९ गेलीं आठ वर्षें दुय्यम प्रतीचें व वरिष्ठ शिक्षण बायकांस देशी भाषेंतून देण्याच्या फार उपयोगी व महत्त्वाच्या प्रयोगाबद्दल पसंतीचें चिन्ह म्हणून 'श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसे इंडियन वुइमेन्स युनिव्हर्सि-टीस महत्वाची मदत द्यावी. व अशी मदत या युनिव्हर्सिटीच्या अंतस्थ कारभारांत जेणेंकरून ढवळाढवळ होईल अगर तिच्या स्वातंत्र्यास बाध येईल अशा अटी न घालतां द्यावी अशी या कौन्सिलची सरकारास शिफारस आहे.

१० या इलाख्यांतील पंचायतींची संख्या वाढावी व त्या लोकप्रिय व्हाव्या म्हणून गांवपंचायतींसंबंधाचे, सरकार ठराव नंबर ५५ अ तारीख ७ मार्च १९२२ यांत ठरविलेले घरपट्टीचे कनिष्ट दर निमे कमी करावे. व या ठरावांत येणाऱ्या "कॅपिटल व्हॅल्यू" शब्दांच्या ऐवजीं "मार्केट व्हॅल्यू" असे शब्द दाखल व्हावे अशी या कौन्सिलची गव्हर्नर इन् कौन्सिल यांस शिफारस आहे.

११ या इलाख्यांतील शेतकरी लोकांचीं, फिरतीवरील व इतर सर-कारी अधिकारी वेठबिगार करून घेतात म्हणून जीं गाऱ्हाणीं आहेत त्यांची चौकशी करण्याकरितां व अशा पद्धति बंद करण्याचे उपाय सुच-विण्याकरतां एक कमिटी नेमावी. व त्यांत बिन अधिकारी लोकांचे बहु-मत असावें अशी या कौन्सिलची गव्हर्नर इन् कौन्सिल यांस शिफारस आहे.

१२ या इलाख्यांतील मूळ रहिवाशांच्या सद्य:स्थितीची व त्यांच्या तक्रारींची चौकशी करण्याकरितां व त्यांची सुधारणा व उन्नति होण्याचे उपाय सुचविण्याकरितां बिनअधिकारी बहुमत असलेली एक कमिटी नेमावी अशी या कौन्सिलची गव्हर्नर इन् कौन्सिल यांस शिफारस आहे.

१३ " प्रॉइन्स ऑफ दिल्ली " योजनेंत ठरविलेल्या सूचनांचा अंमल होण्याकरतां योग्य त्या तजविजी कराव्या अशी या कौन्सिलची सरकारास शिफारस आहे.

## फेब्रुवारी १९२६ रोजीं केलेलें बजेट वादविवादावरील भाषण.

**मि. ना. रा. गुंजाळ**—( पुणें जिल्हा ) मराठींत भाषण केलें.

अध्यक्ष महाराज, बजेटावर वादविवादात्मक चर्चा करण्यापूर्वी मला असें सांगावेसें वाटतें कीं, ऑनरेबल फायनान्समेंबर यांनीं बजेट तयार करण्याचें कामीं प्रातिनिधिक संस्था म्हणजे लोकलबोर्ड व म्युनिसिपालिट्या यांचा विचार घेतला असतां तर बजेट कौन्सिलांत निराळयाच तऱ्हेनें मांडलें गेलें असतें. परंतु ऑनरेबल फायनॅन्स मेंबर यांनीं हा मार्ग अंगिकारला नाहीं. बजेटांत मुख्य गौणभाग असा आहे कीं, तें सरकारी कामगारांनींच मात्र सेक्रेटरीएटमध्यें तयार केलें व कौन्सिल पुढें मांडलें. पुढील वर्षाच्या बजेटाच्या वेळीं ही उणीव राहू नये अशी माझी इच्छा आहे. प्रातिनिधिक स्थानिक संस्थांबद्दल जर सरकारास अगत्य वाटत नाहीं तर लोकांनीं सरकारचा मान कां ठेवावा व हें बजेट मंजूर कां करावें यास कांहीं कारण नाहीं. जे सभासद सरकारच्या बाजूनें मत देतात ते खरोखर लोकांचे खरे प्रतिनिधी नाहींत व कौन्सिलाकरतां असले माणसांची निवड करीत जाऊं नका म्हणून आमचे मतदारवर्गास आम्हांस शिकवणें भाग पडेल.

डेव्हेलपमेंट योजनेकरतां या बजेटांत योजना केलेली मोठी रक्कम व त्याकरतां सरकारनें आधींच खर्च केलेले कोटयावधि रुपये ही माझ्या

2623



मतें सार्वजनिक पैशाची निवळ उधळपट्टी आहे. व त्यावर परदेशी कॉन्ट्राटदार पुष्ट होण्यास सरकारची मदत आहे. ही फक्त मुंबई शहरांतच खर्च करण्याऐवजीं ती मुंबईच्या आसपासच्या लहान बंदराच्या दुरुस्तीस ज्यास्त उपयोग करून घेऊन लावतां येईल. जो आपले सर्वस्व, नाश पावण्याच्या भीतीनें, पणास लावीत नाहीं अशा धूर्त माणसासारखी वागणूक सरकारनें करावी. डेव्हलपमेंटची योजना जर फसली तर सरकारास लोकांच्या पैशाबद्दल जबाबदार रहावें लागेल. व लोकांची अप्रीति करून घ्यावी लागेल. ऑनरेबल फायनन्स मेंबर यांनीं याचा विचार करावा व कौन्सिलानें लोकांच्या हिताकडे लक्ष देऊन या योजनेस मंजुरी देण्याचें नाकारावें असें माझें स्पष्ट मत आहे.

सक्कर बॅरेजवर कोट्यावधि रुपये आधींच खर्च झाले आहेत व त्याच कामाकरतां कोट्यावधि रुपयांची आणखी मागणी मंजूर करण्याची आपणाकडे मागणी आहे या गोष्टीचाही आपण लक्षपूर्वक विचार केला पाहिजे. ही पुरवणी मागणी या सभेपुढें मंजुरी मांडण्यापूर्वीं या सभेच्या सभासदांची, ऑनरेबल जनरल मेंबर यांनीं त्यांस जातीनें त्या ठिकाणीं तपासास नेऊन, अशी खातरी केली नाहीं कीं, बॅरेज हें गरीब रयतेच्या उपयोगाचें काम आहे किंवा मनसोक्त वागणारे व मोठे सिंधचे जमीनदार यांच्या उपयोगाचें काम आहे. ऑनरेबल जनरल मेंबर यांच्या मार्फत ही रक्कम खर्च झाली आहे म्हणून त्यांची या कामीं खरोखर मोठी उणीवेची गोष्ट झाली आहे. म्हणून आपण बजेटांत बॅरेजकरतां तरतूद केलेली रक्कम मंजूर न करतां जिल्ह्या जिल्ह्यांतून ' सेकंड क्लास इरिगेशन'चीं कामें नवीन काढण्याकरतां त्या रकमेचा उपयोग केला पाहिजे. असें केलें असतां प्रत्येक गांवच्या शेतकऱ्यांस, शे दोनशें एकर जमिनीस पाणी पुरवतां येऊन त्याचा फार फायदा होईल. म्हणून या गोष्टीकडे विशेष लक्ष देण्यांत यावें अशी सरकारास माझी विनंति आहे.

या बाबतींत मी वेळोवेळीं सरकारास सूचना केल्या आहेत. व स्वःत शेतकरी म्हणून व शेतकऱ्यांचा प्रतिनिधी म्हणून या कौन्सिलास मला असें दाखवावयाचें माझें कर्तव्य वाटतें कीं या सूचनांचा सरकारकडून विचार झाला नाहीं.

**सक्तीचें शिक्षण**—सक्तीचें शिक्षणाकरतां लागणारी ज्यास्त रक्कम सरकार आम्हांस देत नाहीं. आणि डिस्ट्रिक्ट लोकल बोर्डे व म्युनिसिपालिट्या यांनीं लोकांवर जादा कर बसवून ज्यास्त खर्च भागवावा असें म्हणतें. शाळा खात्याचा ताबा घेण्याबद्दल त्यांच्या मागें सरकारची निकड आहे व कांहीं लोकलबोर्डें व म्युनिसिपालिट्या या नीतीस बळी पडल्या आहेत. पाश्चिमात्य देशाच्या पद्धतीवर आमचे लोकांस शिक्षण देण्याची जर सरकारची खरोखर इच्छा असेल तर त्यांनीं फायद्याच्या राखीव खात्यांतून आम्हांस अधिक पैसे द्यावेंत. सरकारनें सारामाफीची लाखो एकर फारेस्टची जमीन आपलेकडे राखून ठेवली आहे व त्यांचा वसूल आपणांकडे घेत आहे. हा वसूल व असल्याच मार्गानें येणारा वसूल त्यांनीं शाळाखात्याकरतां निराळा काढून ठेवला पाहिजे. खरें बोलावयाचें म्हणजे लोकांस शिक्षण देणें हें सरकारचें कर्तव्य आहे व या इलाख्यांतील शेतकरी व इतर लोकांस आणखी कराचें ओझें सहन करतां येण्यासारखें नाहीं असा माझा ठाम विश्वास आहे. इंग्लंड, आस्ट्रेलिया, जपानसारख्या पाश्चिमात्य देशांतील लोकसंख्या व वसूल यांचे संबंधाचा ( ऑनरेबल ) फायनन्स मेंबरनें आपल्या भाषणांत जो उल्लेख केलेला आहे त्याचा हेतू आमचे डोळ्यांत धूळ फेकण्याचा आहे. कारण लोकसंख्या व वसूल यांचें प्रमाण दाखवितांना, शिक्षण आरोग्य वगैरे बाबतींत त्यांत असलेल्या सोईचा उल्लेख त्यांनीं केला नाहीं. अबकारीखात्यासंबंधीं ऑनरेबल फायनन्स मेंबरचे शेरे केवळ चीड आणणारे आहेत. त्यांचें म्हणणें असें आहे कीं, देशी दारूचा खप कमी होत असल्यानें अबकारीचें उत्पन्न कमी पडत आहे व इंग्रजी दारूची मागणी वाढत आहे व याचा उलट परिणाम, पाणी पुरवठा, शिक्षण, रस्ते वगैरे यांच्या योजनेवर होत आहे. हा मुद्दा चमत्कारिक आहे अगर नाहीं याचा आपण विचार करूं. ऑनरेबल फायनन्स मिनिस्टर यांची इच्छा दिसतें कीं, दारूच्या नादीं असलेल्या लोकांची संख्या वाढावी व त्या योगें अबकारीचें उत्पन्न वाढावें. याचा अर्थ खरोखर असा आहे कीं, आमच्यांत दारूच्या खपास उत्तेजन देऊन अबकारीचें उत्पन्न वाढवावें व नंतर त्या उत्पन्नाचा रस्ते देणे. पाणी पुरवठा आणि शिक्षण या कामाकडे त्यांस उपयोग करतां येईल. असल्या

साधनांनीं घडवून आणलेल्या सुधारणा क्वचितच आपल्या उपयोगी पड-तील. कारण आमच्यांतील दारूचा वाढता खप आम्हांस अशा सुधारणांचा फायदा घेण्यास नालायक करील. अबकारी उत्पन्नांत वाढ करून जर आमची हीन स्थिति आणावयाची असेल तर सुधारणा आमच्या कांहीं उपयोगी पडतील किंवा कसें ही विचार करण्यासारखी गोष्ट आहे.

हिंदुस्थानसरकारकडून मिळणाऱ्या सुमारें तीस लक्ष रुपये देणगीचा उपयोग खेडेगांवांतील शेतकी व उद्योगधंदे यांची सुधारणा करण्याकडे व्हावा. कारण, नेक नामदार गव्हर्नरसाहेबांनीं आपल्या भाषणांत आधींच कबूल केलें आहे कीं, खेडेगांवांतील उद्योगधंद्याकडे सरकारनें पुरेसें लक्ष दिलेलें नाहीं.

युनायटेड प्राव्हिन्सेस कौन्सिलपासून या कामीं धडा घ्यावा व असा ठराव मंजूर करावा कीं, हिंदुस्थानसरकारकडून या इलाख्यास मिळालेली रक्कम खेडेगांवांतील उद्योगधंद्याची घडी बसविण्याकडे लावावी व या प्रमाणें खेडेगांवची उन्नति करावी.

सालोसाल बजेटांत वाढत्या आकड्यानीं दाखविल्या जाणाऱ्या जमीन-बाबेकडे सुद्धां कौन्सिलनें लक्ष पुरवलें पाहिजे. हल्लींची जमीन धाऱ्याची पद्धति शेतकऱ्यांस फार जाणवत आहे व या क्रमाक्रमानें होणाऱ्या वाढीस कायम धारापद्धति सुरू करून आळा घातला पाहिजे. असें झालें असतां लोकलबोर्डें म्युनिसिपालिट्या व गांवपंचायती यांस द्यावे लागणारे निर-निराळे कर देण्यास लोकांस हल्लींसारखे कठीण जाणार नाहीं. व सर-कारनें कायम धारापद्धति सुरू केली व जमीनधारा यापुढें वाढणार नाहीं. अशी लोकांची खात्री झाली म्हणजे लोकांना गांवपंचायती लोकलबोर्डें आणि म्युनिसिपालिट्या यांस मदत करतां येईल. असें मला वाटतें.

सनदी नोकरांच्या पगारांच्या बाबतींत मला असें सुचवितां येईल कीं, यापैकीं कांहीं जागा बंद कराव्या. व बाकीच्या लोकांकडून जास्त काम घ्यावें असें केल्यानें लीकमिशन नेमण्यापूर्वीं जी रक्कम पगार व भत्ते वगैरेंत खर्च होत होती ती पुरी पडेल. व लोकांवर जादा कर बसवि-ण्याची जरूर पडणार नाहीं. पाणी शोधणारे मेजर पामसन यांस नेमण्या-

बद्दल गेल्या सालच्याही बजेटांत मंजूर केलेल्या व या बजेटांत योजना केलेल्या रकमेमुळें या इलाख्यांतील प्रत्येक शेतकऱ्यांस अत्यंत त्वेष आला आहे. मेजर पागसन यांनीं आधीं वीस ते पंचवीस हजार रुपये खर्च केले आहेत. व कांहीं जिल्ह्यांत कांहीं भोकें घेतलीं आहेत. परंतु या भोकांतून येणारे पाणी पिण्याच्या व शेतकीच्या उपयोगीं पडले किंवा नाहीं याची माहिती नाहीं. तसेंच पाणी शोधण्याच्या कामीं आमच्या शेतकऱ्यांचा आणखी किती पैसा मेजर पागसन गट्ट करणार हेंही आम्हांस समजत नाहीं. खरें बोलावयाचें म्हणजे आमच्यांत यापेक्षां चांगले पाणी शोधणारे आहेत. व ते आमच्याकरतां पाणी शोधीत असतात. व याप्रमाणें ते शोधीत राहतील. या रकमेतून या गरीब लोकांस मदत मिळेल तर कौन्सिल त्यांचे आशीर्वाद मिळवील. आमचे पाणी शोधणारे पाणी प्रत्यक्ष लागलें तर आपल्या मजुरीची मागणी करतील व पाणी न लागले तर मजुरी मागणार नाहींत. आमच्यांत असले निष्णांत पाणी शोधणारे असतां आमच्यांवर एक मेजर पागसनप्रमाणें गोरा पाणी शोधणारा आमच्या शेतकऱ्यांवर लादला आहे.

व जर मेजर पागसन यांची रक्कम या कौन्सिलानें मंजूर केली तर ज्यांनीं मेजर पागसन यांची नेमणूक होण्यास अनुकूल मत दिलें व जे त्याकरतां मत देतील अशा या कौन्सिलच्या सभासदास पुन्हा मत देऊ नका अशी मतदाराकडे आम्हा शेतकऱ्यांस मागणी करावी लागेल. त्याचप्रमाणें बातमीच्या डायरेक्टरचें खातें या कौन्सिलवर लादलें आहे. म्हणून त्या खात्याची रक्कम आपण नामंजूर केली पाहिजे या करण्यापासून शिल्लक राहील. सोपीव खात्याच्या बाबतींत मिनिस्टरच्या जागेखेरीज खात्याच्या मुख्याच्या जागा असण्याची जरुरी नाहीं. कारण असल्या जागा राखीव खात्यांत नाहींत म्हणून या जागा बंद करून पुष्कळ रक्कम वाचवावी अशी या कौन्सिलास माझी मागणी आहे.

चावड्या या सदराखालीं खर्च न झालेली शिलक म्हणून मोठी रक्कम दाखविली आहे. व याचें कारण असें सांगण्यांत येतें कीं चावड्यांची मागणी नाहीं. परंतु हें खरें नाहीं. चावड्याना सरकार मदत देते ही गोष्ट

खेडेगावच्या लोकांस माहीत नाहीं व म्हणून ते अशा रकमांची मागणी करीत नसतील. या रकमेंत शिल्लक पाडावी हें योग्य नाहीं.

वर सुचविलेल्या दृष्टीनें बजेटाचा बहुमतानें स्वीकार होईल तर कोर्ट फी. स्टांपडयूटी यांची योजलेली वाढ करण्याच्या रूपानें ज्यादा कर मंजुरीकरितां ठेवण्याची सरकारास जरुरी पडणार नाहीं. तथापि शेतकऱ्यांच्या हिताविरुद्ध असलेले बजेट कौन्सिलांत मंजूर करून घेण्याचा सरकारचा हट्टच असेल तर सर्व पक्षांच्या सभासदांस, बजेटांस हरकत घेण्यास व तें नामंजूर करण्यांस मी विनंती करीन. मी स्वतः शेतकरी म्हणून व शेतऱ्यांचे हित संभाळणाऱ्या सभेचा सेक्रेटरी म्हणून मी या कौन्सिलांत विनंति करीत आहे. कौन्सिल सरकारच्या वजनास बळी पडून जर या बैठकींत जुलमी कर मंजूर करील तर शेतकऱ्यांच्या प्रतिनिधीस व लोकप्रिय पुढाऱ्यांस, शेतकऱ्यांस असे सांगावे लागेल कीं सरकारास कर देऊं नका. व असहकारितेची मोहीम सुरू करा.

# रा. नारायणराव रामजी गुंजाळ यांनीं

## सन १९२६—२७ सालचे बजेटवर केलेल्या कौन्सिलमधील भाषणावर मुंबई क्रॉनिकलच्या ता. २४-२-२६ चा अभिप्राय.

त्या दिवशीं झालेल्या भाषणांत उत्कृष्ट भाषणें दोनच झालीं व तीं म्हणजे रा. नारायणराव गुंजाळ व रा. सुर्वे यांचीं होत. सदर भाषणें मराठींत झालीं व मुख्य मुद्यांची चर्चा विनोदात्मक रीतीनें केल्यामुळें भाषणाचा योग्य तो परिणाम झाला. सदरहु दोन्ही गृहस्थ रा. गुंजाळ व सुर्वे यांस खेडेगांवांतील परिस्थितीची माहिती दुसऱ्या कोणाही मेंबरापेक्षां जास्त असल्यानें त्यांनीं सरकारच्या धोरणाचा स्पष्ट भाषेंत निषेध केला ही अगदीं स्वाभाविकच गोष्ट आहे.

REFBK-0002723

दा. क्र. २८23